# Final Report of

Minor Research Project funded by
UGC (WRO), Pune
Letter No.23-297/12 (WRO) Date 25/02/2013
In the subject 'Marathi' entitled,

# 'परभणी जिल्ह्यातील दलितांची लोकगीते : एक विवेचक अभ्यास'

## 'Parbhani Zilyatil Dalitanchi Lokgite : Ek Vivechak Abhyas'

***Submitted to***

The Joint Secretary,
University Grants Commission
Western Regional Office,
Ganeshkhind, Pune -411007

***By***

*Principal Investigater*
Dr.Sanjay Bansidharrao Kasab
Assistant Professor
Dept. of Marathi
S.S.Suryabhanji Pawar Mahavidyalaya,
Purna (Jn.) Dist.Parbhani-431511 (M.S.)

Nov, 2017

# DECLARATION

I hereby declare that the Minor Research Project (MRP) entitle परभणी जिल्हयातील दलितांची लोकगीते एक विवेचक अभ्यास (**Parbhani Zilhyatil Dalitanchi Lokgite Ek Vivechak Abhyas**) Sanctioned by UGC is original work carried out by mein the Dept. of **Marathi**, Swantrya Sainik Suryabhanji Pawar Mahavidyalaya, Purna (Jn.) Dist.Parbhani

During **Jun**. **2013 to Jun** 2015

**Dr.SANJAY BANSIDHAR KASAB**

Dept. of Marathi

S.S. Suryabhanji Pawar Mahavidyalaya,

Purna (Jn.) Dist.Parbhani

# <u>CERTIFICATE</u>

This is to certify that, The Minor Research Project of Principal Investigator (PI) Dr. Sanjay Bansidharrao Kasab has uploaded with the executive summary of the project on the college website. The URL link is

His certificate is as per the requirement under Minor Research Project (MRP) guidelines.

**Principal**

(Signature and Seal)

**अर्पणपत्रिका**

सांस्कृतिक व सामाजिक समृद्ध समाजजीवनाचा वारसा
टिकविण्यासाठी आपले आयुष्य खर्ची करणाऱ्या
सर्व लोककलावंतांना समर्पित...

# मनोगत

'परभणी जिल्ह्यातील दलितांची लोकगीते : एक विवेचक अभ्यास' या विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्लीकडून मिळालेल्या लघुशोध प्रकल्पांतर्गत शोधनिबंध लिहितांना अनेक लोककलावंतांनी व समाजातील ज्येष्ठ मंडळींनी मला उदात्त अंत:करणाने सहकार्य केले. या प्रकल्पासाठी मला माझ्या महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा.डॉ.रामेश्वर पवार, अध्यक्ष मा.गुलाबराव कदम, तत्कालीन प्राचार्य डॉ.राम जाधव, प्रभारी प्राचार्य डॉ.शारदा बंडे,सद्याचे प्रभारी प्राचार्य डॉ.पी.डी.सूर्यवंशी यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. माझे बंधू प्रा.डॉ.मारोती कसाब यांनी माझ्यासोबत अनेक गावांना भेटी देण्यासाठी आपला अमूल्य वेळ दिला. अनेक ग्रंथांची मदत करून चर्चा केली, माझा विश्वास वाढवून बळ दिले. संशोधनाच्या कामी मला सामाजिक जाणिवेतून मदत करणारे सामाजिक कार्यकर्ते माझे बंधू प्रा.डॉ.डी.आर.कसाब, प्रा.डॉ.सुरेश चौथाईवाले,वैद्यकीय अधिक्षक मा.डॉ.सुनिल गायकवाड, मा.बी.एस. दादा कांबळे, किशनराव दुधगोंडे, प्रा.पी.डी. घोडे, प्रा.गणपत वाघमारे, डॉ.प्रकाश भांगे, माझे सासरे पोलीस निरीक्षक विजयकुमार सूर्यवंशी, भगवान कांबळे गुरूजी, विठ्ठल कदम, गोविंदराव उफाडे, चंदन लोंढे, ॲड. बालाजी सूर्यवंशी तसेच या संशोधनासाठी मला मानसिक बळ देणारा माझा मित्र माधव यादव (अधीक्षक,जिल्हा उपनिबंधक कार्यालय, परभणी) व सत्वशिला वहिनी यांचेही मन:पूर्वक आभार.

पाथरी येथील लोककलावंत के.आर. बुरखुंडे, शाहिर कांताबाई मनेरे, सोनपेठ येथील गायिका आशाताई गायकवाड, शाहिर ज्ञानोबा गायकवाड, सेलू येथील प्रल्हादबाबा घोडे, शाहिर आठवे, जाधव काका, परभणी येथील गंगाधर पवळे, मानवत तालुक्यातील रामकिशन वाकुडे, पूर्णा येथील आदिनाथ इंगोले या सर्व गायक, शाहिर, कवी, लोककलावंतांनी मोलाचे सहकार्य केल्यामुळे हा माझा लघुशोध प्रकल्पाचा शोधनिबंध पूर्ण होऊ शकला. या सर्वांच्या ऋणातच रहाणे मी पसंत करेल. प्रबंध लेखनासाठी वेळ देणारी माझी सहचारिणी जयश्री, आमचा लाडका हर्षवर्धन ज्यांच्यामुळे माझा हा प्रवास सुखकर झाला ते माझे माय-बाबा, सौ.सुरेखा वहिनी,

माझ्या दोन्ही बहिणी, भावजी आणि भाच्चे व क्षितीज, सृष्टी यांचेही हातभार या कामी लागले आहेत.

सामाजिक क्षेत्रातील उपेक्षित लोककलावंतांना न्याय देणाऱ्या या प्रकल्पासाठी मला अर्थसहाय्य केल्याबद्दल मी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली या संस्थेचाही ऋणी आहे.

या शोधप्रबंधाची सुंदर आणि सुबक अक्षरजुळवणी करणारे आमचे मित्र सुरज चौधरी, माझ्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ.विलास काळे, सहाय्यक ज्ञानोबा मुळे काका, माझ्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक सहकारी व कर्मचारी बांधव यांचेही या प्रसंगी मोलाचे सहकार्य लाभले या सर्वाचे आभार व्यक्त करतो.

**संजय बन्सीधरराव कसाब**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | - | परभणी जिल्ह्याचे वेगळेपण |
| प्रकरण दुसरे | - | परभणी जिल्ह्यातील दलित जीवन |
| प्रकरण तिसरे | - | परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीतांचे वर्गीकरण |
| प्रकरण चौथे | - | परभणी जिल्ह्यातील दलितांची लोकगीते : संकलन आणि आकलन |
| प्रकरण पाचवे | - | निष्कर्ष व समारोप |
| संदर्भ ग्रंथसूची | - | |
| परिशिष्ट क्र.१ | - | निवडक छायाचित्रे |

# प्रकरण पहिले

# परभणी जिल्ह्याचे वेगळेपण

## १.१ प्रास्ताविक :

'जगात जर्मनी आणि भारतात परभणी' अशी ओळख असलेला परभणी हा महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण जिल्हा आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात या जिल्ह्याने अमिट ठसा उठविलेला आहे. दख्खनच्या पठारावरील मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यांपैकी राज्याच्या स्थापनेनंतर दोन वेळेस विभाजित होऊनही आपले अस्तित्व टिकवून ठेवणारा 'परभणी' हा मराठवाड्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण जिल्हा आहे. महाराष्ट्राला ज्वारीची रसद पुरविणारा, अर्ध्या अधिक महाराष्ट्राची भूक भागविणारा शेतकरी, कष्टकरी व कामगारांचा हा जिल्हा अजून एका कारणाने वैशिष्ट्यपूर्ण ठरलेला आहे. ते म्हणजे परभणी जिल्ह्यातील गाव, वाडी-वस्ती तांड्यावरील कष्टाने रापलेले चिवट लोकजीवन गोंधळमहर्षी राजारामबापू कदम या लोककलावंताने आपल्या कलेच्या माध्यमातून देश-विदेशात गाजविलेला जिल्हा म्हणजे परभणी होय.

हमखास पाऊस पडणारा, निसर्ग सौंदर्याने नटलेला गोदावरी, दुधना, कसुरा, पूर्णा इत्यादी नद्यांनी सुपीक बनविलेला हा जिल्हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक लोकजीवनात मानाने विराजमान झालेला आहे. अजिंठा आणि बालाघाटच्या डोंगररांगांनी आपल्या कुशीत घेतलेला परभणी जिल्हा महाराष्ट्रातील खरोखर एक वैशिष्ट्यपूर्ण जिल्हा आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज आणि निजामाच्या दुहेरी गुलामगिरीत अडकलेला मराठवाड्यातील परभणी जिल्हा स्वातंत्र्यानंतर आत्मसन्मानाने उभा राहिला असला तरी, सरंजामशाहीच्या अवशेषांमुळे या जिल्ह्यातील जातदांडगे आणि धनदांडग्यांकडून गोरगरिबांचे मोठ्या प्रमाणावर शोषण झालेले दिसून येते. आजही परभणी जिल्ह्यातील दलित समाजावरील अन्याय-अत्याचार कमी झालेले नाहीत त्याचाच परिणाम म्हणून दलितांच्या आत्मसन्मानासाठी आंबेडकरी प्रेरणेच्या जाणिवेतून दलित कलावंतांनी

सांस्कृतिक चळवळ उभी केली आणि या चळवळीतून दलितांचे प्रेरक लोकगीते जन्माला आली.

परभणी जिल्ह्यातील लोकगीतांचा अभ्यास करण्यापूर्वी या जिल्ह्याचा समग्र आढावा साररूपाने अभ्यासणे मला महत्त्वाचे वाटते. सदरील प्रकरणात खालील मुद्द्यांच्या रूपाने आपण तो आढावा घेऊ.

## १.२ परभणी जिल्ह्याचा पूर्व इतिहास :

परभणी हा मराठवाड्यातील एक महत्त्वाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. "सोळाव्या ते अठराव्या शतकात परभणी जिल्हा पाथरी सरकार व वाशीम सरकार असा विभाजित होता. साखरखेड्र्याच्या लढाईनंतर (१७२४) हा भाग निजामशाहीत समाविष्ट झाला. १९४८ साली हैद्राबाद मुक्तिसंग्रामानंतर १९५६ साली हा संयुक्त महाराष्ट्राचा भाग बनला. १ मे १९६० नंतर स्वतंत्र महाराष्ट्रातील एक जिल्हा बनला."[१]

परभणी जिल्हा हा दोन वेळेस विभाजित करण्यात आला. १९८२ साली औरंगाबाद आणि परभणी जिल्ह्याचे विभाजन करून जालना जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. पूर्वी यात परभणी, परतूर, पाथरी, गंगाखेड, जिंतूर, हिंगोली व कळमनुरी या तालुक्यांचा समावेश होता. १९८२ नंतर परतूर तालुक्यासह सातोना, आष्टी, मंठा आदी मोठ्या गावांचा समावेश जालना जिल्ह्यात करण्यात आला. १ मे १९९९ रोजी पुन्हा एकदा विभाजन होऊन परभणी जिल्ह्याचा भाग कमी करण्यात आला. हिंगोली, कळमनुरी व वसमत या महत्त्वाच्या तालुक्यांचा समावेश हिंगोली जिल्ह्यात करून सेनगाव व औंढा नागनाथ या नवीन तालुक्यांची निर्मिती करून हिंगोली पाच तालुक्यांचा समावेश करण्यात आला तर परभणी हा परभणी, जिंतूर, पाथरी, गंगाखेड या तालुक्यासह मानवत, सेलू, पालम, पूर्णा व सोनपेठ या नवीन तालुक्यांसह नऊ तालुक्याचा नवीन परभणी जिल्हा अस्तित्वात आला.

सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय दृष्टीने हा जिल्हा सतत अग्रक्रमावर चर्चेत राहिला. परभणी हा जिल्हा सर्वात जुना असूनही स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात राजकीय वर्चस्व निर्माण करू शकला नाही. हा संत-महंतांचा जिल्हा म्हणून ओळखला जात असला तरी या जिल्ह्यात विषमतावादी विचाराने बुसरटलेल्या

मानसिकतेमुळे जातीय दंगली, धार्मिक दंगलीमुळे बदनाम होण्याची वेळ या जिल्ह्यावर आलेली पहावयास मिळते. दलित-सवर्ण वादातून सामाजिक असंतोष नेहमीच निर्माण झालेला पहायला मिळतो.

परभणी जिल्ह्याला 'प्रभावती' नावानेही ओळखले जात होते. आजचा परभणी जिल्हा नऊ तालुक्यांचा असून गोदावरी, पूर्णा, दूधना, कसुरा या नद्यांमुळे समृद्ध शेतीचा वारसा जतन करत आला आहे. भास्कर भट्ट बोरीकर, संत जनाबाई, बी. रघुनाथ, ना.गो. नांदापूरकर, भ.मा. परसवाळे, इंद्रजित भालेराव, गणेश आवटे यासारखे साहित्यिकही या जिल्ह्याला लाभले आहेत. समृद्ध साहित्यिकांची परंपरा लाभलेला एक महत्त्वपूर्ण जिल्हा म्हणून परभणीची ओळख आपल्याला पहायला मिळते.

### १.३ भौगोलिक स्थिती :

महाराष्ट्राच्या दख्खन पठारावर असलेला परभणी हा एक महत्त्वाचा जिल्हा होय. महाराष्ट्राच्या पूर्व दिशेला असलेला हा मराठवाड्यातील जुना जिल्हा आहे. "जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ६२१४ चौ.कि.मी. असून समुद्रसपाटीपासून सर्वसाधारण उंची ४५७ मीटर आहे. जिल्ह्याचा सर्वात उंच भाग जिल्ह्याच्या पश्चिमेस अजिंठा पर्वतात असून, त्याची उंची ५७९.७० मीटर आहे तर सर्वात सखल भाग जिल्ह्याच्या पूर्वेस जेथे गोदावरी नदी जिल्ह्याची सीमा पार करते तेथे आहे व त्याची उंची ३६६ मीटर आहे. जिल्ह्यात सर्वसाधारणपणे पश्चिमेकडून पूर्वेकडे उतार असल्याचे स्पष्ट होते."[२]

परभणी जिल्ह्यात गोदावरी ही प्रमुख नदी असून पूर्णा, दुधना, कसुरा या नद्याही वाहतात. जायकवाडी, येलदरी व लोअर दुधना या तीन प्रमुख धरणाचे कालवे आहेत. यामुळे बहुतेक शेती ही गाळाची सुपीक आहे. महाराष्ट्रातील शेती पावसावर अवलंबून असली तरी परभणी जिल्ह्यात पावसाचे प्रमाण बऱ्यापैकी असल्यामुळे लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे.

"अलिकडील काळात जून ते डिसेंबर या कालावधीत नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून सरासरी ८०४.४ मी.मी. पाऊस पडतो. याशिवाय ऑक्टोबर व नोव्हेंबर अखेरपर्यंत इशान्य मोसमी वाऱ्यापासून सर्वसाधारणपणे १०२ मी.मी. पाऊस पडतो.

जिल्ह्याच्या सर्व भागात सारखाच पाऊस पडत नाही. पश्चिमेकडून पूर्वेकडे पावसाचे प्रमाण वाढत जाते."[३]

परभणी जिल्ह्यात अजिंठा पर्वताची एक रांग जिंतूर तालुक्यातून जाते. या रांगेमुळे उत्तरेकडे पठार तयार झाले असून त्या पठाराची समुद्रसपाटीपासूनची उंची १५०० ते १६०० फूट एवढी आहे. या पठाराचा दक्षिणेकडे उतार असून तो दुधना नदीच्या खोऱ्यात समाविष्ट होतो. याशिवाय जिल्ह्याच्या दक्षिणेकडे गंगाखेड तालुक्यामध्ये बालाघाट पर्वताच्या कमी उंचीच्या रांगा पसरलेल्या दिसून येतात. पाथरी, गंगाखेड, पालम, सोनपेठ, पूर्णा व परभणी तालुक्याचा काही भागांचा समावेश गोदावरीतील नदीच्या सुपीक खोऱ्यात होतो. सेलू, जिंतूर तालुक्याचा समावेश दुधना नदीच्या खोऱ्यात होतो तर परभणी, पूर्णा तालुक्यातील काही भाग पूर्णा नदीच्या खोऱ्यात येतो. परभणी जिल्ह्यातील सर्वात मोठी असलेली गोदावरी नदी प्रमुख असून भौगोलिक दृष्टीने तिचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. गोदावरी नदी पाथरी, मानवत,सोनपेठ, गंगाखेड, पालम तालुक्यातून पूर्वेस ७९ कि.मी. वाहत जाऊन नांदेड जिल्ह्यात प्रवेश करते.

औरंगाबाद जिल्ह्यातून आलेल्या पूर्णा नदीवर येलदरी येथे धरण बांधण्यात आलेले आहे तर दूधना नदीवर गोमेवाकडी (सातोना) येथे लोअर दुधना धरण बांधले आहे. परभणी परिसरात जंगल भागही काही प्रमाणात आहे. भौगोलिकदृष्ट्या शेतीसाठी उपयुक्त असलेला जिल्हा म्हणून मराठवाड्यातील परभणी जिल्ह्याची एक महत्त्वाची ओळख आहे.

## १.४ परभणी जिल्ह्यातील शेती व पीकपाणी :

परभणी जिल्ह्यात गोदावरी, पूर्णा, दूधना, कसुरा या नद्यांच्या पात्रांमुळे गाळाची सुपीक शेती आहे. खरीप व रब्बी दोन्ही हंगामात चांगल्या प्रकारचे उत्पन्न होते. पावसाचे प्रमाण बऱ्यापैकी असल्यामुळे खरीप हंगामात कापूस, तूर, मूग, सोयाबीन व उडीद ही पिके घेतले जातात तर रब्बी हंगामात ज्वारी या प्रमुख पिकाबरोबरच करडई, हरभरा, गहू, भुईमूग व अलिकडे ऊसाचे क्षेत्रही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. परभणी जिल्हा 'ज्वारीचे कोठार' म्हणनही ओळखला जातो. परभणी जिल्ह्यातून संपूर्ण

महाराष्ट्रभर ज्वारीचे धान्य पुरविले जाते. पिकाच्या दृष्टीने परभणी जिल्ह्याला महाराष्ट्रात महत्त्वाचा जिल्हा मानला जातो.

परभणी जिल्ह्यातील शेती पावसावर अवलंबून असली तरी पैठण येथील जायकवाडी धरणाच्या पाण्याचे परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सिंचन आहे. तसेच येलदरी येथील सिद्धेश्वर प्रकल्प या धरणाचा शेतीच्या सिंचनासाठी मोठा फायदा होतो. याशिवाय कर्परा, मासोळी डिग्रस, मुदगल व मुळी या मध्यम प्रकल्पांतर्गतही जलसिंचन व्यवस्था कार्यान्वित आहे. अलिकडे लोअर दुधना प्रकल्पही कार्यान्वित झाल्यामुळे शेतीला मोठा फायदा झाला आहे. अलिकडील काळात जून ते डिसेंबर या कालावधीत नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून सरासरी ८०४.४ मी.मी. पाऊस पडतो. याशिवाय ऑक्टोबर व नोव्हेंबर अखेरपर्यंत इशान्य मोसमी वाऱ्यापासून सर्वसाधारणपणे १०२ मी.मी. पाऊस पडतो. जिल्ह्याच्या सर्व भागात सारखाच पाऊस पडत नाही. पश्चिमेकडून पूर्वेकडे पावसाचे प्रमाण वाढत जाते.[४]

पावसाच्या लहरीपणामुळे एखाद्या वर्षी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली तर मजूर वर्ग पुणे, नाशिक, मुंबईकडे कामासाठी स्थलांतरीत होतो. विशेषतः या जिल्ह्यातील दलित समाज भूमीहीन असल्यामुळे तो मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत होतो; तो स्थिर राहत नाही. ऊसतोड कामगारांची संख्याही परभणी जिल्ह्यात कमी नाही.

परभणी जिल्ह्यात अलिकडे पाण्याची मुबलक उपलब्धता वाढत असल्यामुळे दुग्धव्यवसाय, फळे, भाजीपाला यांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. हिरव्या चाऱ्याची उपलब्धता होत असल्यामुळे दुग्धव्यवसायाला चांगले दिवस आले आहेत. यामुळे शेतकरी स्थिर स्वरूपाचे जीवन जगत आहे. जिल्ह्यात सर्वसाधारणपणे पिकांना पोषक असलेल्या द्रव्यांची पोषक कसदार काळी जमीन मोठ्या प्रमाणात आहे. कसदार जमिनीमुळे पिकांची उत्पादनक्षमता परभणी जिल्ह्यात चांगल्या प्रकारची आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे असल्यामुळे प्रगत शेतीसाठी विद्यापीठाचे मार्गदर्शन लाभते. नवीन जातीचे वेगवेगळ्या पिकाचे वाण या जिल्ह्यात विकसित करण्यासाठी विद्यापीठाची मदत होते. दुग्धव्यवसाय, फळबागा, मत्स्यशेती, रेशीम शेती आदींसाठीही विद्यापीठाचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळते. शेतीची

संपन्नता वाढवण्यास मदत होते. कृषी विद्यापीठाने अनेक गावे दत्तक घेवून शेती व्यवसाय विकसित करण्यासाठी मदतीचे पाऊल उचलले आहे.

## १.५ परभणी जिल्ह्यातील सामाजिक परिस्थिती :

भारतीय समाजरचनेनुसार विविध स्तरीय समाजजीवन महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांप्रमाणे परभणी जिल्ह्यातही पहायला मिळते. जातीय आधारित समाज संरचना हे भारतीय समाजरचनेचे वैशिष्ट्य परभणी जिल्ह्यात केंद्रस्थानी आहे.

बालाघाट आणि अजिंठ्याच्या डोंगरकुशीत वसलेला गोदावरीचा सुपीक खोरा म्हणजेच परभणी जिल्हा होय. गोदावरीच्या आजुबाजूला निर्माण झालेल्या पठारावर काळी कसदार जमीन असून या जमिनीवर उपजीविका करणारे लोकजीवन या जिल्ह्यात आहे. "या जिल्ह्यात पैनगंगा, गोदावरी, पूर्णा, कयाधू, दुधना या प्रमुख नद्या असल्यामुळे सुदैवाने सुपीक प्रदेशाचे वरदान जिल्ह्यास लाभले आहे. पैनगंगा खोरे, कयाधू नदीचे खोरे असे भौगोलिक विभाग आहेत. या जिल्ह्यात अनेक ठिकाणी उत्खनन झाले असून पुरातत्व विभागाला प्राप्त झालेली हत्यारे, मानवी अवशेष व शिल्पे यामुळे प्राचीन इतिहासावर बराच प्रकाश पडतो. सातवाहन, वाकाटक त्यानंतर कलचुरी, राष्ट्रकुट अशा विविध राजवटीत या भागात इतिहास घडला. शेवटची राजवट यादवांची होती. १२९४ पासून मुस्लिमांची सत्ता आली. यानंतर बहामनी राजवट आली. ही राजवट ३० वर्षे टिकली. पुढे निजामशाही, आदिलशाही व इमादशाही राजवटींपकी इमादशाहीमध्ये परभणी जिल्हा होता."[५] या सर्व राजवटीचा मराठवाड्यावर जसा सरंजामी सामाजिक परिणाम झाला तसाच परभणी जिल्ह्याच्या समाजजीवनावर सरंजामशाहीचा मोठा परिणाम झालेला दिसून येतो. आजही येथील समाजव्यवस्था सरंजामी प्रवृत्तीची असल्याने सामान्य माणसांचे शोषण मोठ्या प्रमाणात होते.

कठोर पद्धतीची जातव्यवस्था जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दिसून येते. धर्मव्यवस्थेचा पगडा असलेली मानसिकता सामाजिक न्यायाची भूमिका समजून घ्यायला तयार नसल्याने या जिल्ह्यात जातीय सलोखा दिसून येत नाही. हिंदू-मुस्लिम, हिंदू-दलित असा सामाजिक भेदाचा वैरभाव या जिल्ह्यात सदैव राहिलेला आहे.

स्वातंत्र्यानंतर सुद्धा समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांचा अंगिकार करणारा समाज निर्माण होऊ शकला नाही. त्यामुळे या जिल्ह्यात जातीच्या नावावर दलितांच्या मानवी हक्काचे संरक्षण झालेले दिसून येत नाही. मानवी अस्तित्वाच्या संदर्भाने डॉ.मार्टिन ल्यूथर किंग म्हणतात, "माणसाची अवहेलना करणारा कायदा हा कायदाच नव्हे, ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. रंग, धर्म किंवा वांशिकता याच्या आधारावर उच्चनीचतेच्या कल्पना कायद्यात आणणे व त्याद्वारे भेदभाव निर्माण करणे म्हणजे मानवी अस्तित्वाची विटंबनाच करणे होय."[६]

अशीच मानवी विटंबना या जिल्ह्यात दलित समाजाच्या वाट्याला वारंवार आलेली पहायला मिळते. भूमिहीन असलेला दलित समाज सामाजिक अस्तित्वाने शून्य आहे. संरमजामशाही प्रवृत्ती आजही मोठ्या प्रमाणात पहायला मिळते. जातीच्या नावावर माणसांचे शोषण केल्यामुळे सामाजिक सलोखा दिसून येत नाही. "धर्म, वर्ण, जात, रंग, वंश इत्यादी घटकांच्या आधारावर जेव्हा एखाद्या समाजात भेदभाव केला जातो तेव्हा न्याय संकल्पनेला समानतेचा पाया लाभत नाही, ही गोष्ट उघड आहे. अशा समाजात ज्याची शक्ती अधिक असते अशा वर्गाचे किंवा गटाचे प्राबल्य माजते."[७] तसेच प्राबल्य सवर्ण मानसिकतेचे परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पहायला मिळते. दलितांची संख्या मोठ्या प्रमाणात असूनही त्यांचे शोषण आणि विटंबना सतत होत असते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरीत होऊन १९५६ साली दलितांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. धर्मांतरानंतर दलित समाजाला शत्रूसारखी वागणूक संपूर्ण महाराष्ट्रात मिळाली. तशी परभणी जिल्ह्यातही दलितांना शत्रू मानून अपमानजनक वागणूक देण्यात आली. त्याचा परिणाम म्हणजे अन्याय-अत्याचारात वाढ होत गेली. या अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरीत झालेल्या शाहिरांनी आत्मसन्मानाची चळवळ निर्माण केली. पारंपरिक लोकगीताच्या माध्यमातून सामाजिक मनोरंजन करणाऱ्या शाहिरांनी परिवर्तनाच्या चळवळीला गतिमान करण्यासाठी योगदान दिल्याचे चित्र पहायला मिळते.

## १.६ परभणी जिल्ह्यातील लोकजीवन व सांस्कृतिक जीवन :

समाजजीवनात अनेक लोकरूढी, परंपरा, म्हणी, वाक्प्रचार, गीते, कथा, सण-उत्सव, लोकजीवनाला गतिमान करत असतात. लोकजीवनात जत्रा-यात्रांच्या माध्यमातून समूहजीवनाला एकत्र करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात होत असतो. परभणी जिल्ह्यात खंडोबाची यात्रा, सय्यद शहा तुराबुलहक्क यांची यात्रा खूप प्रसिद्ध आहे. तुरतपीराचा दर्गा सर्वांसाठी खुला आहे. याठिकाणी हिंदू पुजारी असून हिंदू व मुस्लीम दोन्ही धर्माचे लोक उपासक आहेत.

परभणी जिल्ह्यात बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार पहायला मिळतात. बौद्ध, जैन, मुस्लिम, हिंदू, ख्रिश्चन धर्माचे लोक आपापले सण-उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करतात. परभणी जिल्हा संतांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. संत नामदेव, संत जनाबाई, विसोबा खेचर आदी संतांची परंपरा लाभलेली आहे. त्याचबरोबर बैलांच्या शर्यती, शंकरपट, हाल्याच्या टक्करी, कुस्त्या आदींनी परभणी जिल्ह्यातील लोकजीवन समृद्ध होते. गोंधळी, पांगूळ, मसणजोगी, वासुदेव, पोतराज, देवकरणी, कुडमुडे जोशी, ग्रामजोशी, गोसावी, जंगम ही सर्व मंडळी लोकजीवनाचे संचित घेऊन सकाळीच भिक्षा मागण्यासाठी दारात हजर होत असत. यांनी बऱ्यापैकी लोकसंस्कृती टिकवून ठेवली होती. आज ती मंडळी नाहीसी होतांना दिसत आहे. सर्व परंपरा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

मानवी जीवनाचा सांस्कृतिक इतिहास जतन करणाऱ्या ग्रामीण उत्सव-परंपरा, जत्रा-यात्रा शहरीकरणामुळे मोडीत निघत आहेत. पारंपरिक व्यवसाय सोडून भटकंती करणारा समाज आता शहराकडे वळत आहे. नवीन रोजगार स्वीकारून तो आता शहराकडे स्थिरावतांना दिसून येत आहे. ग्रामीण जीवनातील शेतीच्या व्यवसायाची साधनेही बदलत आहेत तशी शेतीच्या मशागतीची पद्धतीही बदलत आहे. बलुतेदारी पद्धत या सर्व आधुनिकीकरणामुळे मोडकळीस आलेली पहायला मिळत आहे. परभणी जिल्हासुद्धा याला अपवाद नाही.

परभणी जिल्ह्यातील लोकजीवन व संस्कृती या सर्व कारणांमुळे बदलत आहे. सुपीक काळी जमीन असलेल्या समाजाचे लोकजीवन समृद्ध होते. त्यामुळे धार्मिक

कार्यक्रम व सांस्कृतिक उत्सवही मोठ्या प्रमाणात होत असत. आता हळूहळू जागतिकीकरणातील सर्व बदलांचा परिणाम लोकजीवनावर होतांना दिसून येत आहे.

मोबाईल, इंटरनेट, गुगल, युट्युब, वॉटसऍप, फेसबुकवर तरुण पिढी आयुष्याचा अमूल्य वेळ खर्ची करतांना दिसून येते. परभणी जिल्ह्याचे लोकजीवन समृद्ध असून सांस्कृतिक जीवनही उत्साही आहे. वेगवेगळ्या विचारांच्या चळवळी या जिल्ह्यात पहायला मिळतात. फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची चळवळ, मार्क्सवादी डाव्या विचारांची चळवळ, शेतकरी संघटना, विद्यार्थी आंदोलने, कामगार चळवळी आदी चळवळी लोकजीवनाला व्यापून अन्यायाच्या विरोधात संघर्ष करतांना दिसून येतात. बौद्ध, जैन, मुस्लिम, हिंदू, ख्रिश्चन, शीख धर्माचे लोक आपापले सण-उत्सव सांस्कृतिक कार्यक्रमांतून साजरे करतांना दिसून येतात.

परभणी जिल्हा हा निजामकालीन सरंजामशाही असलेला शेतीमुळे बऱ्यापैकी उत्पन्न असलेला, कमी श्रमात भरपूर मिळत असल्यामुळे येथे आळसी व भांडखोर प्रवृत्तीही उफाळून येतांना दिसून येते. जातीय, धार्मिक दंगलीत अशा निष्क्रीय तरुणांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. तर परिवर्तनाचा विचार करणाऱ्या तरुणांचाही समतेसाठी संघर्ष सतत चालू असतो. ‘आहे रे’ व ‘नाही रे’ दोन्ही विचारांचे लोक मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्यामुळे संघर्षाची भूमी म्हणून परभणी जिल्हा ओळखला जातो.

**समारोप :**

महाराष्ट्राच्या मध्यभागात हृदयस्थानी असलेला परभणी हा मराठवाड्याचा केंद्रबिंदू असून सर्व प्रकारच्या चळवळीचे केंद्र म्हणून परभणी जिल्ह्याचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्वातंत्र्य आंदोलन, मराठवाडा मुक्ती आंदोलन व संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची जोरदार पार्श्वभूमी लाभलेली असल्यामुळे संघर्षाची भूमी म्हणून या जिल्ह्याकडे पाहिले जाते. १९७८ साली एकीकडे मराठवाडा विकास आंदोलन तर दुसरीकडे डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषाच्या नावाने मराठवाडा विद्यापीठ नामांतरीत व्हावे, यासाठीचा ‘नामांतर लढा’ अशी दोन्हीही आंदोलने या जिल्ह्याने पाहिली आहेत. यापैकी पहिल्या आंदोलनातून वसंतराव नाईक मराठवाडा

कृषी विद्यापीठाची स्थापना परभणी येथे झाली तर दुसऱ्या आंदोलनातून हजारो वर्षांपासून गुलामीत खितपत पडलेल्या दलित समाजाला आत्मभान आले आणि दलितांच्या अस्मितेचा आणि अस्तित्वाचा रणसंग्राम उभा राहिला. या पार्श्वभूमीवर सांस्कृतिक पातळीवर दलितांच्या लोकगीतांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

❐❐❐

**संदर्भ**


१) बालवाड रमेश, आपला परभणी जिल्हा, विद्याभारती प्रकाशन, गुजराती शाळेसमोर, मेन रोड, लातूर -४१३ ५१२, पृ.क्र.५

२) कित्ता, पृ.क्र.१७

३) कित्ता, पृ.क्र.२०

४) कित्ता, पृ.क्र.२०

५) पाटील श्रीराम (संपा.), मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, १४, मायानगर, एन-२, सिडको, औरंगाबाद-४३१००३, द्वितीय आवृत्ती, सप्टेंबर २००३, पृ.क्र. १३९

६) लुलेकर प्रल्हाद, जातक (प्रा.दत्ता भगत गौरवग्रंथ), लेख उद्धृत सामाजिक न्याय : संकल्प आणि सिद्धी, वाघमारे जे.एम., कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, पृ.क्र३४

७) कित्ता, पृ.क्र.३०

## प्रकरण दुसरे

# परभणी जिल्ह्यातील दलित जीवन

### २.१ प्रस्तावना

पारंपरिक सरंजामी मनोवृत्ती मिरवणाऱ्या परभणी जिल्ह्यात अतिशूद्र गणल्या गेलेल्या दलितांचे जीवन अज्ञान आणि अंधश्रद्धा, दारिद्र्य यात कमालीचे गुरफटून गेलेले आहे.

“गावात घर नाही
शिवारात शेत नाही
कोण करील माझं वाकडं
अरे जळू दे की सारा देश
त्यात जळेल माझं एक झोपडं”[१]

परभणी जिल्ह्यातील दलितांची स्थिती काय असेल, याचा नेमका अंदाज परभणी जिल्ह्यातीलच प्रसिद्ध कार्यकर्ते आणि शाहीर गंगाधर पवळे यांच्या वरील कवणातून येतो. सर्वहारा परिस्थिती लादल्या गेलेल्या परभणी जिल्ह्यातील दलितांची स्थिती सवर्णांच्या प्रचंड दडपणामुळे अत्यंत केविलवाणी झालेली दिसून येते. निजामाच्या राजवटीत मुसलमानी सत्ताधिशांकडून अवमानजनक संभावना दलितांची केली गेली. हिंदू-सवर्ण समाजाकडून मुस्लीम राजवटीचा कित्ता गिरवत स्वातंत्र्यानंतरही दलितांची अवहेलनाच करण्यात आली आहे. त्याच शोषक प्रवृत्तीचे अनुकरण करून दलितांचा छळ करण्यात सवर्णांनी समाधान मानले आहे.

पूर्वाश्रमीचे महार आणि आताचे बौद्ध, त्यांच्याच वस्तीशेजारी राहणारे मांग तथा मातंग, प्रत्येक गावात एखाद दुसरे घर करून राहणारे आणि प्रामुख्याने शहराशी दोस्ती करणारे ढोर, चांभार हे जातसमूह प्रामुख्याने ‘दलित’ म्हणून परभणी जिल्ह्यात ओळखले जातात. त्यांचे सामाजिक जीवन तथाकथित उच्चवर्णीय हिंदू सवर्णांच्या दबावाने काळवंडून गेलेले दिसून येते. गावाच्या गावशिवेबाहेर दलितांच्या वस्त्या आजही बेवारस स्थितीत आढळून येतात. १९५६ साली नागपूर येथे झालेल्या

धर्मांतरानंतर पूर्वाश्रमीच्या महारांचे सामाजिक जीवन काही प्रमाणात सुधारले असले तरी इतर दलितांच्या सामाजिक जीवनात स्वप्रतिष्ठेचा अभाव प्रकर्षाने जाणवावा असा दिसून येतो. स्वातंत्र्यापूर्वी निजाम राजवटीत दलितांना जवळ-जवळ शिक्षणबंदीच होती. मात्र १९४५ नंतर निजाम सरकारच्या काळात दलितांनी 'पस्ता कौम' नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेच्या दबावामुळे निजामाने दलितांच्या मुलांना सरकारी शाळेत प्रवेश देण्याचे फर्मान काढून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची सोय केली होती. तत्कालीन शिक्षणाचा अल्पसा परिणाम म्हणून त्याकाळी काही प्रमाणात दलितांना रेल्वे खात्यात रोजगार मिळाला. महसूल प्रशासनात कोतवाल, चपराशी इत्यादी पदांवर काहींना संधी मिळाली. १९६० नंतर दलितांनी शहरात मोठ्या प्रमाणात स्थलांतर केल्यामुळे नगर परिषदांमध्ये सफाई कामगार म्हणूनही संधी मिळाली. हाताला काम मिळाले, रोजंदारीचा व अस्पृश्यतेच्या प्रश्नाची तीव्रता काहीअंशी कमी झाली असली तरी एकंदरीत दलित वर्गाची आर्थिक स्थिती नाजूकच राहिली. पुढे दलितांतील शिक्षणाचे प्रमाण वाढत गेले. काहींशी आर्थिक स्थिती सुधारत गेली. मात्र राजकीय जीवनात लोकशाही असूनही परभणी जिल्ह्यात दलित नेतृत्व दलितांसाठी फारसे काम करू शकले नाही. बौद्ध धम्माच्या स्विकारामुळे पूर्वाश्रमीच्या महारांच्या जीवनात नवे सांस्कृतिक मन्वंतर घडले, धार्मिक प्रतिमा व प्रतिके बदलली. मात्र मातंग, चांभार, ढोर या दलितांचे सांस्कृतिक जीवन गुलामी व लाचारीचे राहिले.

आजही अनेक दलित हलगी वाजवणे, बुट-चप्पल शिवणे, कातडी कमावणे असे आपले परंपरागत व्यवसाय करताना आढळतात. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे इत्यादी महापुरुषांच्या विचारांनी आजचा दलित तरुण वाटचाल करीत असून लेखक, कलावंत, शाहीर हे वरील महामानवांच्या परिवर्तनवादी विचारांनी आपल्या जीवनात व समाजात परिवर्तन घडवण्यासाठी धडपडत आहेत, ही आश्वासक बाब आहे.

## २.२ दलित म्हणजे काय?

भारतीय समाजव्यवस्था वर्गवादी आणि विषमतावादी असल्यामुळे माणसांचे शोषण अटळ झाले. ब्राह्मणी विचाराने चार वर्ण तयार केले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व

शूद्र. वरील तिन्ही वर्णांची सेवा शुद्रांनी मुकाटपणाने करावी असा दंडकच होता; नव्हे तो धर्म आदेश होता. यापेक्षा पाचवा 'पंचम वर्ण' म्हणून अतिशूद्र हा फार मोठा समूह गावकुसाबाहेर आणि भटकंती करत गावोगाव फिरायचा तर कधी जंगलात रहायचा. त्याला लोकशाहीत एस.टी./एस.टी. असे संबोधले जाते. अशा अतिशूद्र समाजातील जे लोक दळले, भरडले, चिरडले गेले, ज्यांचे अनैसर्गिक पद्धतीने शोषण केले त्यांना 'दलित' असे संबोधले जाते. अशा दलित शब्दाच्या वेगवेगळ्या व्याख्या पहाता येतील.

"दलित याने पीडित, शोषित, दबा हुआ, खिन्न, उदास, तुकडा, खंडीत, तोडना, कुचलना, दला हुआ, पीसा हुआ, मसला हुआ, रौंदा हुआ, हजारो वर्षों तक अस्पृश्य या अछूत समझी जानेवाली उन तमाम शोषित जातियों के लिए सामुहिक रूप से 'दलित' शब्द प्रयुक्त होता है। जो हिंदू धर्म शास्त्रोंद्वारा हिंदू समाज व्यवस्था में सबसे निचे पायदान पर स्थित है। वह दलित है।"[२]

पहिल्या दलित साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे म्हणतात, "महाराष्ट्रापुरते जरी बोलायचे झाले तरी, दलित माणसांचा मोठा वर्ग महाराष्ट्रात अस्तित्वात असून, त्याचे जीवन वेगळे असले तरी इतर वर्गाशी ते संलग्न आहेत. हा वर्ग देशात अग्रेसर असून त्याच्या न्यायी संघर्षाचे परिणाम सर्व समाजावर होत असतात. तो या देशाचा सामाजिक, सांस्कृतिक पाया आहे. परंतु तो पिळला जाणारा आणि कष्ट करणारा 'दलित' म्हणून निराळा आहे आणि उपेक्षित आहे. तो हाडमासाचा केवळ गोळा नसतो; तो निर्मितीक्षम असतो. वास्तव जगात कष्टाचे सागर उपसून, दौलतीचे डोंगर रचतो. एका झाडाखाली तीन दगडाची चूल करून मडक्यात अन्न शिजवून दोन मुले आणि बायको यांना जगवणारा हा दलित वरवर कंगाल दिसत असला तरी त्याची संसार करण्याची इच्छा केव्हाही पवित्र अशीच असते."[३]

'दलित' या संकल्पनेविषयी जेष्ठ समीक्षक डॉ.भालचंद्र फडके म्हणतात, "सामाजिक अन्याय, दारिद्र्य, अज्ञान इत्यादींनी ग्रस्त असा वर्ग म्हणजे दलित वर्ग."[४] तर बाबुराव बागुल म्हणतात, "दलित हे विशेष करून सम्यक क्रांतीचे नाव आहे."[५]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित शब्दाची व्याप्ती समजून सांगताना 'Who were the shudras' या ग्रंथात म्हटले आहे, "चातुवर्ण्याने शुद्राला उच्चनिचपणाच्या शिडीच्या अगदी खालच्या पायरीवर ठेवले आहे. एवढेच नव्हे तर चातुवर्ण्याने त्यांच्यावर असंख्य अपमानास्पद अटी आणि अपात्रदर्शक बंधने लादली आहेत. त्यामुळे शुद्राला कायद्याने जे नीच स्थान देण्यात आले आहे, त्या स्थानापासून वरच्या स्थानावर जायला त्याला सक्त मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे शूद्र नीचातला नीच माणूस, असे हिंदूंना वाटत होते."[६] या शूद्रांना-नीचांना हिंदू संस्कृतीपासून कायमचे दूर ठेवल्याने ते सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेले राहिले. हिंदू संस्कृतीच्या दृष्टीने या सर्व जाती-जमातींचा सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक दर्जा कमी जास्त प्रमाणात एकाच पातळीवर आहे. सर्वांचे दु:ख कमी-जास्त प्रमाणात एकच आहे. उच्चवर्णीय संस्कृतीने या सर्वांना एकाच दु:खाच्या धाग्यात ओवले. या पीडित दलितांचे प्रश्नही एकच आहेत. ते गावांपासून, माणसांपासून पिढ्यान्पिढ्या दूर अलग ठेवले गेले; उपेक्षित ठेवले गेले म्हणून 'दलित' म्हटले की, या शब्दप्रयोगाच्या व्याप्तीत या एकूण उपेक्षित जाती-जमातींचे वर्गसमूह येतात. या समूहाने पिढ्यान्पिढ्या उच्चवर्णीयांचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अत्याचार निमूटपणे सहन केले."[७]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 'दलित' या समूहाची व्याप्ती संशोधनपूर्ण अभ्यासाअंती मांडली आहे. माणसांचे माणूसपण व व्यक्तिस्वातंत्र्य नाकारणाऱ्या कोणत्याही प्रवृत्तीचे समर्थन कोणालाही करता येणार नाही. या देशात तर फार मोठ्या समुहाला उपेक्षित वंचित ठेवून गुलाम बनविले, लाचार केले. सर्वहारा बनवून त्यांच्या अस्तित्वाला नष्ट करण्याचा धर्मशास्त्राच्या माध्यमातून कट रचल्याचे दिसून येते. अशा समुहालाच दलित म्हटले गेल्याचे निदर्शनास येते.

## २.३ परभणी जिल्ह्यातील प्रमुख दलित जाती :

परभणी जिल्ह्यामध्ये दलित समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्य करतो. विशेषत: पूर्वाश्रमीचा महार समाज आणि आताचे नवबौद्ध तसेच मांग तथा मातंग, चांभार, ढोर, बेडा जंगम, मेहतर आदी जाती प्रामुख्याने आपणास आढळून येतात. परभणी जिल्ह्यात दलित समाजाची लोकसंख्या अंदाजे एकूण लोकसंख्येच्या १५ ते १६ टक्के असावी

एवढा मोठा समूह या जिल्ह्यात वास्तव्य करतो. गावकुसाबाहेर राहणाऱ्या या जाती अस्पृश्य म्हणून आजही हिणवल्या जातात.

अस्पृश्यता हा कायद्याने गुन्हा असला तरी हिंदू धर्माच्या परंपरेनुसार आजही परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अस्पृश्यता पाळली जाते. आजही उघडपणे रोटीव्यवहार होत नाही; तर बेटीव्यवहार अजिबात होतच नाही. आर्थिक दुर्बलतेमुळे हा समूह पारंपरिक व्यवसाय व मोलमजुरी करून आपली उपजीविका करतो, शेतीवर कामगार, वेठबिगार म्हणून तर कधी सालगडी म्हणून तो राबतो. पूर्वाश्रमीचे महार आणि आताचे नवबौद्ध यांच्यात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळे आणि धर्मांतरामुळे आत्मसन्मान व स्व-अस्तित्वाचे भान निर्माण झाले. शिक्षणाकडे वळल्यामुळे या समाजाची काही मंडळी सरकारी नोकऱ्या, उद्योगधंदे, व्यापार, राजकारण, शिक्षण आदि क्षेत्रात प्रवेशित झाली. प्राध्यापक, डॉक्टर, वकील, शिक्षक, अभियंता, बँका, सहकार, रेल्वे, पोस्ट आदी क्षेत्रात शिक्षणामुळे या समूहाने मोठ्या प्रमाणात नोकऱ्या मिळवल्या. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत गेली. शिक्षणामुळे ते शहराकडे वळले. स्वतंत्र धर्माची संहिता मिळाल्यामुळे, संस्कार, शिस्त, समूहभावनेने आचरण, प्रतिमा व प्रतिके त्यांचा वापर यामुळे त्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला. मरीआईचा गाडा जाऊन, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने सभागृह आले, बौद्ध विहारे बांधली गेली. स्वतंत्र प्रार्थनास्थळ मिळाल्यामुळे आत्मसन्मान वाढला. विवेकाच्या पातळीवर व धर्माच्या पातळीवर ते स्वतंत्र झाल्यामुळे परिवर्तनाचे वातावरण या समाजात मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. शहरात आणि खेड्यात हा समाज जागरूक समाज म्हणून ओळखला जातो. संघर्ष व परिवर्तनासाठी त्यांनी बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचे अधिष्ठान स्वीकारले. १९५६ ला स्वीकारलेल्या बौद्ध धर्मांतरामुळे या समाजात नवचैतन्य निर्माण झाले. आज दलित समाजाचे नेतृत्व करणारा समाज म्हणून त्यांच्याकडे आशेने बघितले जाते.

महार-मांग अशा शब्दाने ज्यांचे भावा-भावाचे नाते सांगितले जाते. अशा पूर्वाश्रमीचा महार आणि आजचा नवबौद्ध समाजाच्या बरोबरीने असलेला मांग तथा मातंग समाज हा गावोगावी दिसून येतो. १९५६ धर्मांतरानंतर महार समाजाने सोडून

दिलेले सर्व गुलामीची कामे ग्राम व्यवस्थेकडून मातंग समाजाच्या डोक्यावर लादण्यात आली. गावपातळीवर महारानंतर मातंगच गुलामी करणारा समूह होता. हिंदू समाजव्यवस्थेचा घटक म्हणून त्याला गुलामीची सर्व कामे करावी लागली. या समूहात पोतराज, देवकरणीचे प्रमाण बऱ्यापैकी आहे. दवंडी देणे, फडे तयार करणे, बाज विणणे, दोरखंड तयार करणे, शेडा करणे, हलगी वाजवणे, तिफण उचलणे, सरपन फोडणे आदी कामे त्याला करावी लागतात. स्वातंत्र्यानंतर या समूहाची म्हणावी तशी प्रगती झाली नाही. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे हा समूह शहराकडे किंवा नोकरीकडे वळला नाही. अज्ञान-अंधश्रद्धा, दारिद्र्य, बेकारी, आळसी प्रवृत्ती यामुळे तो गावातच हतबलतेने आपले जीवन जगताना दिसून येतो.

१९९० नंतर भांडवलशाही आणि शहरीकरणामुळे तो शहराकडे वळत आहे. शिक्षणाचे प्रमाणही काही प्रमाणात वाढत आहे. शिक्षणामुळे बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार या समाजात होत आहे. नव्या दमाच्या पिढीची तरुण मंडळी परिवर्तनवादी विचारांमुळे समाजात परिवर्तन करु पहात आहे. यासाठी वेगवेगळ्या आंदोलनातून कार्य करतांना दिसून येत आहे. अण्णा भाऊ साठे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या माध्यमातून प्रबोधनाचे, गीत गायनाचे कार्यक्रम या समूहात होताना दिसून येत आहेत. परिवर्तनाच्या दिशेने हा समूह येताना दिसतो आहे, ही फार मोठी आश्वासक गोष्ट आहे.

महार-मांग-चांभार या जाती गावपातळीवर महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यापैकी चांभार ही हिंदू समूहातील दलित म्हणून गणली गेलेली महत्त्वाची जात आहे. चांभार ही जात महार-मांग यांच्यापेक्षा स्वतःला उच्च समजते. चांभार जातीकडे स्वतःचा व्यवसाय असल्यामुळे त्याचा पोटाचा प्रश्न सहजतेने सुटलेला आहे. जोडे शिवणे, मोट तयार करणे, चाबुक बनविणे, कातड्याची कामे करणे ही त्यांची पारंपरिक कामे होत. गावपातळीवर महार-मांगाएवढे अवमानकारक जीवन या समूहाच्या वाट्याला आलेले दिसत नाही. चांभार समाजही आता शिक्षणामुळे शहराकडे वळत आहे. शिक्षणाचे महत्त्व त्यालाही समजले आहे. त्याचीही आर्थिक स्थिती सुधारत आहे. परंतु तो स्वतःला हिंदू समजत असल्यामुळे पारंपरिक जीवनातच तो स्वतःला धन्य समजतो.

परिवर्तनाच्या चळवळीत किंवा आंदोलनात त्याचा सहभाग नगण्य दिसून येतो. चांभार आणि ढोर हे कातड्याची कामे करणारे समूह असल्यामुळे ते स्वतःला एकमेकांजवळची मानत असली तरी त्यांचा बेटी व्यवहार होत नाही. ढोर कातडी रंगवण्याची कामे करत होते. कारखानदारीमुळे त्यांचा पारंपरिक धंदा बसला. तीही चांभारासारखीच जोडे शिवण्याची कामे करू लागली आहेत. शिक्षणाचे प्रमाण ढोर समाजातही समाधानकारक नाही. या समाजातही अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्र्य, उपासमार दिसून येते. हा समूहसुद्धा परिवर्तनवादी विचार व आंदोलनापासून दूरच आहे. शिकलेली मुलं शिक्षणाविषयी जागरूक आहेत पण सर्वच दलित समाजात अज्ञानामुळे दारिद्र्य, अज्ञान, उपासमार व व्यसनाधिनता मोठ्या प्रमाणात दिसून येते. एक वर्ग परिवर्तनवादी विचारांची चळवळ समग्र दलितांसाठी राबवतांना दिसून येतो, तर दुसरा वर्ग पौराणिक मानसिकता टिकवून पारंपरिकता जतन करतांना दिसतो आहे.

परभणी जिल्ह्यातील दलित समाजाच्या वेगवेगळ्या जाती जवळपास सारख्याच अवस्थेत दिसून येतात. आहार-विहार, भाषा, व्यवहार काही प्रमाणात सारखेच आहेत. शहरी समूह सर्वच दलित समाज फुले-शाहू-आंबेडकर, अण्णा भाऊ साठे यांच्या परिवर्तनवादी विचाराला स्वीकारण्याचा प्रयत्न करतांना दिसून येतो. अन्याय-अत्याचाराच्या विरोधात समुहाने संघर्ष करण्याचा मानस करतोय. ही समतेसाठी जमेची बाजू असून भारतीय लोकशाही मूल्यांचे संवर्धन करणारी वाटते.

परभणी जिल्ह्यातील दलित समाजाची ओळख करून घेतांना त्यांचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक आढावा घेणेही महत्त्वाचे ठरेल. पुढील घटकांमध्ये परभणी जिल्ह्यातील सामाजिक जीवनाची पुसटशी ओळख करून घेऊया.

### २.४ परभणी जिल्ह्यातील दलितांचे सामाजिक जीवन :

परभणी जिल्हा हा सरंजामी प्रवृत्तीचा असल्याने इथे जातीय प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात टिकून आहे. सवर्ण समाजामध्ये मराठा, धनगर, हटकर, माळी, वंजारी, जातीचा समूह मोठ्या प्रमाणात असून काही प्रमाणात ब्राह्मण, मारवाडी, लिंगायत आहेत या समुहाकडून दलितांवर अन्याय-अत्याचाराच्या घटना नेहमीच घडत असतात. दलित समाज भूमीहीन असल्यामुळे सवर्णांच्या शेतावर त्याला कामासाठी जावेच लागते

म्हणून तो अन्यायाचा बळी ठरतो. जातीय मानसिकतेमुळे परभणी जिल्ह्यात दलितांवर अनेकदा हल्ले झाले असून, कित्येक दलितांना आपला जीवही गमवावा लागला आहे. सामाजिक समता निर्माण करण्यासाठी चारित्र्यसंपन्न पिढी तयार करावी लागते. यासंदर्भाने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, “जोपर्यंत सामाजिक घडण तुम्ही बदलणार नाही, तोपर्यंत कोणतीही सामाजिक सुधारणा घडवून आणणे असंभव आहे, याबद्दल मला मुळीच शंका नाही. समग्र समाजाला सद्यस्थितीत प्रतिकार, सामर्थ्य अथवा आक्रमक वृत्ती निर्माण करता येत नाही. जातींच्या आधारावर कोणत्याही योजनेची इमारत उभारता येणार नाही. तुम्ही राष्ट्र निर्माण करू शकत नाही अथवा चारित्र्यसंपन्न पिढी तयार करू शकत नाही. तुम्ही जातींच्या आधारावर काहीही करायला जाल तर ते कोसळून पडल्याशिवाय राहणार नाही.”[७]

जातीय मानसिकतेमुळे भारतीय लोकशाहीमध्ये सुद्धा दलित समाजाची सामाजिक स्थिती ढासाळलेलीच आपल्याला दिसून येते. त्याच प्रकारची स्थिती परभणी जिल्ह्यात पहायला मिळते. या जिल्ह्यात अनेकदा दलित महिलांवर अन्याय आत्याचार झाले आहेत. तर पुरुषांनाही जातीय मानसिकतेतून जीवंत मारल्याच्या अनेक घटना घडल्याचे वास्तव पहायला मिळते.

जात-धर्माच्या नावावरून दलित समाजाची अवहेलना आणि शोषण मोठ्या प्रमाणात या जिल्ह्यात होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित झालेल्या कार्यकर्त्यांकडून, लेखक, कलावंत व शाहिरांकडून शोषणाच्या विरोधात आंदोलने केली जातात. मात्र जातदांडग्यांकडून सत्तेच्या बळावर ती मोडून काढली जातात. लोककलावंत गीतांच्या माध्यमातून प्रबोधन करून दलित समाजाचा आत्मसम्मान जागृत करण्याचे कार्य होते. राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासोब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे, संत रोहिदास या महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथीच्या कार्यक्रमांतून दलित समाजात मोठ्या प्रमाणात प्रबोधन केले जात आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांची रुजवात करण्यासाठी कार्यकर्ते सतत शासन दरबारी आंदोलनातून संघर्ष करताना दिसून येतात.

धर्माच्या नावाखाली या जिल्ह्यात दलित-सवर्ण संघर्ष निर्माण करणाऱ्या प्रवृत्ती सतत उफाळून येतात. दलित समाजातील अनेक शाहीर गीतांच्या माध्यमातून सामाजिक सलोखा निर्माण करणारी परिवर्तनाचे गीते गातांना दिसतात. दलित-सवर्ण, हिंदू-मुस्लीम, बौद्ध, जैन, शीख-ईसाई या सर्वांनी सामाजिक सौहार्द राखणे गरजेचे आहे. परभणी जिल्ह्यात तसे प्रयत्न व्हावेत यासाठी काही लोक प्रयत्न करतांना दिसताहेत, ही जमेची बाजू आहे.

## २.५ शैक्षणिक स्थिती :

परभणी जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतरामुळे धर्मांतरीत झालेला बौद्ध समाज तथागत गौतम बुद्ध, महात्मा फुले,राजर्षी शाहू महाराज राजकीय स्थान व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन जागृत झाला. महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथीच्या माध्यमातून प्रबोधनाच्या कार्यक्रमातून मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधन करू लागला. त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व त्याला पटले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते, “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.”[८] या विचारांमुळे आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात संघर्ष करण्याचे बळ मिळाले. शिक्षणामुळे माणसाची प्रतिष्ठा वाढते. त्याला माणूसपणाची जाणीव होते. या विचारांची जाणीव दलितांना झाली. निजामाच्या राजवटीत सरंजामशाहीच्या मुजोर प्रवृत्तींच्या मानसिकतेमुळे दलितांना खूप अन्यायाला सामोरे जावे लागले. शरीराने आणि मनाने शेकडो वर्षे उपाशी असलेला दलित समाज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या उर्जावंत विचाराने नवचैतन्यमय झाला होता. त्यामुळे शिक्षणाविषयी दलित समाजात आकर्षण निर्माण झाले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, “उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस बलहीन होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो.”[९] तशीच काहीशी अवस्था परभणी जिल्ह्यात दलित समाजाची आहे. स्वातंत्र्याच्या कित्येक वर्षानंतर आजही मराठवाड्यासारख्या मागास भागात दलितांवरील अन्याय-अत्याचार थांबले नाहीत. शिक्षणाचे महत्त्व न जाणल्यामुळे वेगवेगळ्या प्रकारचे अन्याय-अत्याचार दलितांवर होताना दिसून येत आहेत.

परभणी जिल्ह्यातील नवबौद्धांची स्थिती सोडली तर इतर दलितांवर आजही अन्याय-अत्याचार होतांना दिसतात. आज परभणी जिल्ह्यातील दलितांना चांगले शिक्षण देऊन माणूसपणाची जाणीव करून देणे व त्यांच्या हक्कांची आणि कर्तव्याची त्यांना ओळख व्हावी यासाठी सार्वजनिक प्रयत्न करणे गरजेचे वाटते. शासकीय आणि सामाजिक पातळीवर त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. तरच दलितांमधील शिक्षणाचे प्रमाण वाढेल असे वाटते.

### २.६ आर्थिक स्थिती :

परभणी जिल्ह्यात काळी कसदार शेती असली तरी येथील दलित बहुतांश भूमीहीन असल्यामुळे तो आर्थिक परिस्थितीने दुबळा आहे. पारंपरिक धंदेही आता नामशेष होतांना दिसत आहेत. रोजंदारीसाठी त्याला शहराकडे वळावे लागत असून शिक्षण व पैसा नसल्यामुळे तो स्वतःचा व्यवसायही करू शकत नाही. शेती नाही, शिक्षण नाही, नोकरी नाही, सामाजिक प्रतिष्ठा नाही या सर्व उपेक्षेमुळे परभणी जिल्ह्यातील दलितांची आर्थिक स्थिती दयनीय आहे.

शिक्षणामुळे काहींना नोकरी व काहीजण शहरात छोटे व्यवसाय करत असले तरी ग्रामीण भागातील दलित आजही हातावर पोट असल्यामुळे त्यांची आर्थिक उन्नती होऊ शकलेली नाही. आर्थिक दुबळ्या परिस्थितीमुळे तो मुलांना चांगले शिक्षण देऊ शकत नाही, चांगले वस्त्र परिधान करू शकत नाही, आरोग्याची काळजी घेऊ शकत नाही, पर्यायी त्याला स्वतःचे जीवन व कुटुंब सन्मानाने जगवता येत नाही. या नैराश्यामधून तो व्यसनाधीनतेकडे मोठ्या प्रमाणात वळला आहे. मुलांना शिक्षण देण्यासाठी तो आर्थिक दुबळेपणामुळे प्रोत्साहीत करू शकत नाही. शहरात झोपडपट्टी व ग्रामीण भागात झोपडी व शासनाच्या घरकुलामध्ये आपले जीवन जगतो. शेतमजूर, हमाल, हॉटेल कामगार, मातीकाम, गवंडी काम, मोंढ्यातील झाडूकाम अशी कष्टाची कामे करून तो उदरनिर्वाह करतो. यामुळे त्याला कमी मोबदला मिळत असल्याने त्याची आर्थिक उन्नती होऊ शकली नाही. आजही परभणी जिल्ह्यातील दलित समाजाला आर्थिक दुर्बलतेमुळे जगणे असह्य वाटते. आर्थिक परिस्थितीने तो मागासलेलाच आहे. त्याला जगण्याची हमी प्राप्त व्हावी यासाठी शासनाने सरकारी

जमीन कसण्यासाठी उपलब्ध करून दिली तर त्यांचा आर्थिक स्तर उंचावणार नसला तरी जगण्याची समस्या काही प्रमाणात सुटेल, असे सुचवावेसे वाटते.

## २.७ राजकीय स्थान :

परभणी जिल्हा हा निजामशाहीच्या अमलात होता. नंतर तो १९५६ ला मुंबई प्रांतात सामील झाला व १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्यातील जिल्हा बनला. वेगवेगळ्या राजकीय प्रभावाचा परिणाम झालेला हा जिल्हा सरंजामी प्रवृत्तीला सोडू शकला नाही. येथील प्रस्थापितांनी साम, दाम, दंड, भेद नितीचा त्यांनी वेळोवेळी वापर करून अल्पसंख्याकांना राजकीय हक्कापासून वंचित ठेवण्यात यशस्वीता टिकवली आहे. तीच परिस्थिती दलितांची सुद्धा दिसून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सायमन कमिशनसमोर साक्ष देताना भारतीय अस्पृश्यांसाठी जी भूमिका मांडली होती, तीच भूमिका आज भारतीय संसदेत मांडून दलितांच्या समस्या सोडवणे गरजेचे आहे. बाबासाहेब म्हणाले होते, "भारतात इतर कोणत्याही अल्पसंख्याकांना राजकीय हक्कांच्या संरक्षणाची जेवढी निकड नाही, तेवढी ती अस्पृश्यवर्गाला आहे. कारण भारतातील अस्पृश्य वर्ग शैक्षणिक दृष्टीने उपेक्षित आहे, आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहे म्हणून मी त्यांच्या राजकीय सुरक्षिततेची मागणी करत आहे."[१०] आजही परभणी जिल्ह्यासारखाच भारतातील दलित असुरक्षित व राजकीय उपेक्षित आहे. परभणी जिल्ह्यात विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था, नगर पालिका सवर्णांच्याच ताब्यात असल्यामुळे दलितांना न्याय व हक्क मिळण्याची हमी देता येत नाही. राजकीय उपेक्षेला आज जिल्ह्यातील दलितांना सामोरे जावे लागते.

राजकीय सत्ता नसल्यामुळे दलितांना शासकीय योजनांचा फायदा योग्य प्रमाणात मिळत नाही. होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात न्याय मिळत नाही. येथील सत्ताधीश नेते दलितांवर झालेल्या अन्यायाला राजकीय दबावाखाली दडपून टाकण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात करतांना दिसतात. यामुळे दलितांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात न्याय मागण्यांसाठी नेहमीच शासन दरबारी संघर्षाची व

आंदोलनाची भूमिका घ्यावी लागते. परभणी जिल्ह्यातील दलित चळवळी आणि आंबेडकरी विचाराच्या शाहिराचे लोकगीते नेहमीच आत्मभान जागृत करण्याचे कार्य करतांना दिसून येतात.

## २.८ सांस्कृतिक जीवन :

मानवी जीवन साहित्य, कला व संस्कृतीमुळे संपन्न व सुसंस्कृत बनते. माणसाला अन्नाची जशी गरज आहे तशीच संगीत, कला, वाद्य, नृत्य, सूर या कलेच्या उपभोगातून तो तृप्त होतो. समूहजीवन यामुळे उदात्त बनते. प्रगतीशील समाजाचे हे वैशिष्ट्य असते. परंतु मानवाच्या विकासाच्या प्रक्रियेत त्याने स्वत:शीच स्पर्धा करून माणसालाच गुलाम केले, अंकित केले. त्याला नैसर्गिक हक्कांपासून वंचित केले. असाच वंचित समूह म्हणजे भारतातील अस्पृश्य समाज होय. तरीही अस्पृश्यांनी प्रगतीसाठी आपली एक स्वतंत्र संस्कृती टिकवून ठेवली. त्यामध्ये लोकजीवनातील संगीत, वाद्य, नृत्य ही उपेक्षितांनी जतन केली. ढोलकी, हलगी, सनई, सूर या वाद्यांच्या माध्यमातून संगीत व सांस्कृतिक जीवन त्यांनी समद्धपणाने टिकवले आहे.

परभणी जिल्ह्यात स्वातंत्र्यानंतरचे बदल स्वीकारून त्यांनी आपली कला विकसित केली आहे. लोकगीत, गाणी, म्हणी, वाक्प्रचार, बोलीभाषा यांचे त्यांनी संवर्धन करून ठेवले आहे. धर्मांतरानंतर दलितांनी जयंती-पुण्यतिथी, महापुरुषांच्या विचाराची संमेलने, परिसंवाद यांच्या माध्यमातून समूहजीवन जगायला सुरूवात केली आहे. तसाच हिंदू म्हणून जगणारा दलित समाज हिंदू संस्कृतीचे सण-उत्सव साजरे करतो तसा तो जयंती उत्सवालाही हजेरी लावतो.

पारंपरिक जीवनात नवे-नवे बदल करण्याचा, आचार-विचार सुधारण्याचा, अभिवादनामध्ये जयभीम, जय लहुजी, जय रविदास असे अनेक बदल स्वीकारण्याचा प्रयत्न करतो आहे. मुलांची नावेसुद्धा आज पारंपरिक राहिले नाहीत. प्रसेनजीत, हर्षवर्धन, क्षितीज, मायावती, अस्मिता, सृष्टी, राजवर्धन, मिलिंद, राहुल अशी ठेवली जात आहेत. लग्नपद्धती ही आज बौद्ध पद्धती, सत्यशोधक विवाह पद्धती, नोंदणी विवाह व पारंपरिक विवाह पद्धतीने केली जातात. मृत्यूनंतर अंत्यविधीला शोकसभा, श्रद्धांजली वाहणे, गोडजेवण न करता चळवळीला किंवा सत्कार्याला निधी देणे, जन्म

दिवसाचा उत्सव न करता तोच पैसा गरजूंना मदत करणे असे अनेक बदल दलितांमध्ये घडत आहेत. तसेच गणपती बसवणे, कंदोरी करणे, सवासनी जेवण, मावंद, सत्यनारायणाची पूजा करणे असे विधीही केले जात आहेत. अशी संमिश्र संस्कृती निर्माण होत असून सांस्कृतिक जीवनाचे नवे-नवे संदर्भ निर्माण होत आहेत.

## २.९ समारोप :

परभणी जिल्ह्यातील लोकगीतांचा अभ्यास करत असतांना परभणी जिल्ह्यातील दलित जीवनाची सारांश रूपाने माहिती असावी, या दृष्टिकोनातून दलित जीवनाचा वेगवेगळ्या दृष्टीने आढावा घेण्यात आला आहे. दलित समाजजीवनाचे वास्तव स्वरूप समजून घेतले असून त्याची सद्यपरिस्थिती ढोबळमानाने येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. दलित जीवन आणि त्याचे स्वरूप या प्रकरणात सविस्तर रूपाने मांडणे हा उद्देश नसून परभणी जिल्ह्यातील लोकगीतांच्या अभ्यासासाठी पुरक अशा पद्धतीने मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. पुढील प्रकरणात परभणी जिल्ह्यातील लोकगीतांचे वर्गीकरण करून त्याची मांडणी करण्याचा संशोधनपूर्ण प्रयत्न करण्यात येईल.

❑❑❑

**संदर्भ**

१) शाहिर गंगाधर पवळे रा.दुरडी ता.जि.परभणी यांची मुलाखत

२) https:/him/Wikipedia.org.

३) साठे अण्णा भाऊ, निवडक वाङ्मय, संपादक अर्जुन डांगळे व इतर, सचिव म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९८, पृ.क्र.११७५, ११७६

४) फडके डॉ.भालचंद्र, दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, पृ.क्र.३३

५) किरवले डॉ.कृष्णा, समग्र लेखक बाबुराव बागूल, प्रतिमा प्रकाशन, १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंटस, नवा विष्णू मंदिर चौक, पुणे, प्रथमावृत्ती नोव्हेंबर २००२, पृ.क्र.११०

६) व्हटकर डॉ.जयवंत, दलित साहित्याची संकल्पना, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. २५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११०३५ प्रथमावृत्ती १५ जानेवारी २००६, पृ.क्र.१२, १३

७) पानतावणे डॉ.गंगाधर, संपादन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, जातीव्यवस्थेचे निर्मूलन, प्रतिमा प्रकाशन, १३६२, सदाशिव पेठ, नवा विष्णू चौकाजवळ, पुणे, प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९८, पृ.१४३

८) पवार दया (निमंत्रक) संपादन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गौरवग्रंथ, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, दादर, मुंबई, तृतीयावृत्ती नोव्हेंबर २००६, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन, बा.ह. कल्याणकर, पृ.क्र.४२१

९) कित्ता, पृ.क्र.४२३

१०) फडके डॉ.भालचंद्र दिनकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शे.का. फेडरेशन, पृ.क्र.१४५

## प्रकरण तिसरे

# परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीतांचे वर्गीकरण

## ३.१ प्रास्ताविक :

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारा परभणी जिल्हा हा लोककलावंतांचा बालेकिल्ला समजला जातो. निसर्गाकडून लाभलेली संपन्न काळी कसदार शेती, विस्तीर्ण शिवार आणि त्यातून निघणारे भरघोस उत्पन्न, महाराष्ट्राची भूक भागविणारा हा जिल्हा पुढे सांस्कृतिक जीवनाची भूक भागविण्यातही मोलाचा ठरतो. एका बाजूला समृद्ध, धनाढ्य, पारंपरिक सरंजामी जमीनदार वर्ग अन् दुसरीकडे त्या जमिनीवर राबणारा शेतमजूर असे दोन्ही वर्ग सतत संघर्षाच्या पावित्र्यात दिसून येतात. त्यामुळे परभणी जिल्ह्याला कडवट संघर्षाची, आंदोलनांची पार्श्वभूमी लाभलेली आहे. अगदी आरंभापासूनच इथे संघर्षाची नांदी झडली आहे. परभणी जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी निजामाच्या विरोधात केलेला उठाव सर्वश्रूत आहे. हुतात्मा बहिर्जी शिंदे वापटीकर, स्वातंत्र्यसेनानी विनायकराव चारठाणकर, दलित मित्र श्रीरामजी भांगडीया, सर्वोदयी नेते गंगाप्रसाद अग्रवाल, भाई अण्णासाहेब गव्हाणे, कॉ.विठ्ठलराव नाईक, भाई बाबाराव नाईक, स्वातंत्र्यसेनानी माजी खासदार देवराव कांबळे, स्वातंत्र्यसेनानी सूर्यभानजी पवार आदी लढवय्यांनी परभणी जिल्ह्यातील संघर्षाची मशाल 'नाहीरे' वर्गाच्या बाजूने पेटती ठेवलेली आहे.

शेतकरी-शेतमजुरांच्या संघर्षाबरोबरच दलितांनी आत्मसन्मानासाठी केलेला संघर्षही तेवढाच महत्त्वाचा आहे. निजामाच्या काळात आणि त्यानंतरही परभणी जिल्ह्यातील दलित सवर्णांच्या अत्याचाराला बळी पडलेला असून, परभणी जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांनी या अत्याचाराच्या विरोधात संघर्ष केलेला आहे. या संघर्षाला बळ देण्याचे काम परभणी जिल्ह्यातील कवी, गायक, कलावंतांनी केले आहे. परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीताचे वर्गीकरण करतांना स्पष्टपणे दोन वर्ग दिसून येतात. एक पारंपरिक लोकरंजनपर, धार्मिक विधीगीते, तर दुसरा वर्ग नव्याची मांडणी करणारा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन निर्माण झालेला परिवर्तनवादी लोकगीतांचा वर्ग. प्रस्तुत प्रकरणात सविस्तरपणे परभणी

जिल्ह्यातील दलित लोकगीतांचे वर्गीकरण करण्यापूर्वी आपण लोकगीत ही संकल्पना समजून घेऊया.

### ३.२ लोकगीत म्हणजे काय?

मानवी जीवन शेती आणि निसर्गाशी एकरूप झालेले असल्यामुळे शेतीचे आणि निसर्गाचे नाते अतूट आहे. कृषी जीवनातील श्रमपरिहारानंतर गायली जाणारी गाणी, रात्रीचे नृत्य, कथाकथन, नक्कल, हास्यविनोद, थट्टामस्करी हे सर्व अनादी कालापासून आलेलं पूर्वजांचे लोकसंचित आहे. लोकसाहित्यातील लोकगीते म्हणजे लोकसाहित्याचा आत्माच समजला जातो. माणसाने जेव्हा शब्द बोलायला सुरूवात केली, तेव्हापासून लोकगीताचा जन्म झाला असे मानले जाते. लोकगीतांचा जन्म कसा झाला यासंदर्भाने ना.रा. शेंडे म्हणतात, "लोकगीते तर लोकसाहित्याचा आत्मा आहे. त्या आत्मपिंडातून स्त्रवणारे विविध भावनिर्झर आणि त्यांची लकाकी मनुष्यमात्राच्या जीवनप्रणालीचे व प्रकृती आणि प्रवृत्तीचे प्रभावी द्योतक ठरतात. शून्यातून ध्वनी निर्माण झाला, त्यातून अक्षरे निनादली. अक्षरांनी शब्द बनला आणि शब्दानी आकार घेऊन एक वेगळे रूप प्रकट केले. त्यातच मनुष्य व्यक्त झाला आणि त्याने आपल्या सहजस्फूर्त भावनांद्वारे शून्याचा आविष्कार घडविला. त्या आविष्कारात लोकगीताचा जन्म झाला. तो शब्दाविष्कार संगीतबद्ध झाला, त्याने वातावरणात चैतन्य निर्माण केले."[१]

ना.रा.शेंडे यांच्या म्हणण्यानुसार मानवी जीवन लोकगीतामधून संगीताच्या साह्याने समृद्ध झाले. लोकगीतामधून लोकसंस्कृती जीवंत राहिली. मानवी जीवनाच्या विविध स्वरूपाचे अनेक दाखले लोकगीतामध्ये बंदिस्त झाल्यामुळे ते लोकपरंपरेने पुढच्या पिढीला मिळाले. लोकगीताचे स्वरूप सांगताना पाश्चात्य लोकसाहित्याचा संशोधक अलेक्झांडर क्राप म्हणतो, "लोकगीत हे गाणे म्हणणे, भावगीत (Lyric) किंवा ललितकृती असून त्याला चाल असते. लोकगीतांचा उगम निरक्षरात झालेला असून त्याचा कर्ता अनामिक असतो. लोकगीत ही भूतकाळातील कृती असून कित्येक शतकांची परंपरा तिच्या पाठीमागे असते."[२]

तर लोकसाहित्याच्या ज्येष्ठ संशोधक डॉ.सरोजिनी बाबर लोकगीतांची व्याख्या करताना म्हणतात, "विविध प्रकारच्या जातीवंत स्वर-विलासांनी शिणगारलेले व

अशिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचिले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यान्‌पिढ्या आपल्या नवनवोन्मेषशाली तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत होय. हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसांच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय."[३]

निरक्षर सामान्य माणसांनी आपल्या लोकवाणीने जसे लोकसाहित्य जीवंत ठेवले तसेच लोकगीतेही लोकवाणीने आणि लोकपरंपरेने जीवंत ठेवले आहेत. लोकसंगीताचे भारतीय अभ्यासक देवीलाल सामर 'लोक' व 'लोकगीते' यांची व्याख्या करताना म्हणतात, "साधारणत: यह सब मान्यता है कि वह गीत लोकगीत है, जो जनसाधारण द्वारा प्रयुक्त होता है और जनसाधारण की भावनाओं को व्यक्त करता है।"[४] देवीलाल सामर यांच्या व्याख्येनुसार सामान्य लोकजीवनाची अभिव्यक्ती ही लोकगीतातून होते. एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिकामध्ये लोकगीतांचे विवेचन पुढीलप्रमाणे केलेले आहे. "कोणतेही गीत अथवा संगीत लोकगीतावर निर्भर, अधिष्ठित आहे. संगीताच्या दृष्टीनेही लोकगीते कसल्याही वाद्य-यंत्राशिवाय स्वाभाविकपणे हृदयस्पर्शी स्वरांचे प्रतिनिधित्व करतात. मानवजातीच्या हृदयातून प्रकृतिदत्त ध्वनीने आणि सहजस्फूर्तपणे प्रकट होणारे लोकगीत हे संगीतच असते. आपल्या हृदयावरील भाव हलका होऊन आनंद प्राप्तीस्तव त्यातून विविध भाव-भावनांची अभिव्यक्ती आविष्कृत होत असते आणि ते बोलण्यापेक्षा गाऊन प्रदर्शित केले जाते."[५] पाश्चात्य लोकसाहित्याचा संशोधक ग्रीम म्हणतो, "लोकगीते अकृत्रिम असतात, ती सहजतेने स्वयंनिर्माण होतात."[६] तर पॅरी म्हणतो, "लोकगीत म्हणजे आदिमानवांचे आल्हाददायी संगीत होय."[७] स्टँडर्ड डिक्शनरी ऑफ फोक्लोअरमध्ये लोकगीताच्या संदर्भाने पुढील व्याख्या करण्यात आली आहे. "लोकगीत म्हणजे ज्या लोकसमूहाचे वाङ्‌मय अलिखित आणि मौखिक परंपरेने चालत येते त्याचे संगीतमय गीत."[८] लोकगीते मौखिक परंपरेने पुढे चालत आलेले असून संगीताच्या व वाद्याच्या साह्याने ती सजलेली आहेत. लोक गीतांचे अभिव्यक्ती संदर्भाने महत्त्व सांगताना हिंदी लोकसाहित्याचे संशोधक राम नरेश त्रिपाठी म्हणतात, "लोकगीत हमारे विकास के इतिहास की अमूल्य निधि के समान है। जातीय हृदय उथल-पुथल, सुख-दु:ख, संयोग-वियोग आदी की भावनाएँ, भिन्न-भिन्न प्रथाएँ गीतों के

रूप में व्यक्त हुई है। इस अमूल्य रत्नराशी को यदि हम जमा न कर सके तो आगे उनका स्वरूप विकृत होकर बदल जाएगा।"[१]

लोकगीतांच्या वेगवेगळ्या संशोधकांनी केलेल्या व्याख्या पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, लोकगीत हे मानवी जीवनाचे एक सांस्कृतिक अंग आहे. ते आदिमानवांच्या कंठातून व्यक्त झालेल्या अभिव्यक्तीचे स्वरूप असून अंतर्मनाचे ते भावगीत आहे. जोपर्यंत मानवी संस्कृती आहे, तोपर्यंत मानवी जीवनात लोकगीताचे महत्त्व कमी होऊ शकणार नाही. लोकगीतांच्या विविध व्याख्यांतून त्याचे स्वरूप व विविध वैशिष्ट्ये आपल्या लक्षात आली आहेत. तरीही लोकगीताचे स्वरूप व विश्लेषण पहाताना आपल्याला त्याचे वर्गीकरण करणे गरजेचे असते. परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीतांचे विवेचन करतांना आपण वेगवेगळ्या स्थळी व वेळी गायिली गेलेली लोकगीते यांचा आढावा घेणार आहोत. लोकगीतांचा कोणी निर्माता नसतो. तो अनामिक असतो. आदिम काळापासून लोकगीत हे लोकवाणीतून लोकपरंपरेने लोकसंस्कृतीच्या वाहकांनी एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत आणण्याचे महत्त्वाचे कार्य केलेले आहे. म्हणूनच आपल्याला लोकगीतांच्या माध्यमातून त्या-त्या काळातील समाजजीवनाचे व संस्कृतीचे संदर्भ दर्शन घडते. लोकगीतांची परंपरा हजारो वर्षांपासून चालत आलेली आहे. लोकगीतांना कालखंडाच्या मर्यादा नसतात किंवा त्यांचा इतिहासही सांगता येत नाही. मानवी जीवनाच्या उदात्त अभिव्यक्तीचे प्रतिबिंब लोकगीतामध्ये आपणास पहावयास मिळते. माणसाचे शेतीशी आणि निसर्गाशी नाते असल्यामुळे तो सतत त्यांच्याशी श्रमाच्या आणि संकटाच्या समयी नाते जोडून असतो. अशावेळी कष्ट आणि श्रम करताना त्याला थकवा येऊ नये म्हणून लोकगीताचा आधार घेतो. गायल्या गेलेल्या लोकगीतांचा आढावा आपण श्रमविषयक लोकगीतामध्ये घेणार आहोत.

## ३.३ दलितांची श्रमविषयक लोकगीते :

लोकगीतांची निर्मिती शहरापासून दूर असलेल्या ग्रामीण भागातील अशिक्षित व निसर्गाशी नातं असणाऱ्या लोकसमूहात झाली. ग्रामीण भागात शेतीची कष्टाची कामे करताना, गावगाड्याच्या वेगवगळ्या कामावर श्रम करताना, जात्यावर दळण दळताना, पेरणी, कापणी, निंदणी, काढणी अशा कामाच्या श्रमपरिहारातून थकवा घालविण्यासाठी गायल्या गेलेल्या लोकगीतांना श्रमविषयक लोकगीते म्हणता येईल. या लोकगीतांमधून मानसिक व शारीरिक थकवा दूर होतो. शेतीवर राबणारा कष्टकरी हा अल्पभूधारक शेतकरी, भूमीहीन आणि दलित आदिवासी वर्ग मोठ्या प्रमाणात काम करतो. ग्रामीण जीवनात कष्टाची कामे करताना थकवा जाणवू नये, हसत-खेळत कामे लगबगीने लवकर उरकावी लागतात त्यामुळे लोकगीताचा आधार घेतला जातो. वामनदादा कर्डकांनी लिहिलेले एक स्त्री जाणिवांचे भावविश्व आविष्कृत करणारे गीत कापणीच्या व लावणीच्या वेळी अनेक बायका गातांना दिसून येतात. दोन बहिणीला एकच भाऊ असतो आणि एकीचे गाव पुर्वेला तर दुसरीचे गाव पश्चिमेला असते. तेव्हा बहिण म्हणते,

“आम्ही दोन बहिणी
दोन गावाच्या गं बारवा
मंदी नांदतो गं पारवा”

शेतीची मशागत करताना गावातील शेताच्या कडेला असलेल्या नदीच्या गाळाच्या जमिनीला ‘गव्हाळ’ म्हणतात. या गव्हाळीत साळीचे, गव्हाचे पीक घेतले जाते तेव्हा वामनदादा म्हणतात,

“नव्ह नव्हाळीचं शेत गव्हाळीचं
शेतात पिक डोले साळीचं
हे गं देनं माझ्या काळ्या मायीचं”

अशा श्रमगीतांतून स्त्री शेतीची भलावण करत काळ्या आईच्या ऋणाची कृतज्ञता व्यक्त करते. शेतीचा डोलारा सर्व पावसावर अवलंबून असतो. पाऊस चांगला, मोसमानुसार पडला तरच शेती चांगली पिकते. नाहीतर दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊन शेतकरी व मजुरांवर उपाशी राहण्याची वेळ येते. उत्तरा नक्षत्र लागताच

शेतकऱ्यांचे डोळे पावसाकडे लागतात. तसा मजूरही आशावादी असतो. अशावेळी पुढील गीताचे स्मरण होते.

“पडत्याल उत्तरा तर भात खाईना कुतरा
न्हाईतर तांदूळ मिळंना पितरा।।”

परभणी जिल्ह्यात मोठ्या सुगीला म्हणजे रब्बीच्या हंगामातील ज्वारीचे पीक काढतांना भलरी गीत गायली जातात. श्रम करणारे शेतमजूर मंडळी एकत्र येऊन हे सामूहिक गीत गातात. विविध भाव-भावनांचा आविष्कार या गीतातून प्रकट होतो. त्या गीताचा आनंद सर्वांना उल्हासीत करतो. भलरी गीत पुढीलप्रमाणे असते,

“भलरी दादा भलरी
गड्या गंगू आली बाजारी
नेसलंय लुगडं जरतारी
आन् मला हळूच हाकमारी
भलरी दादा भलरी
गंगू आलीय मांडवावरी
शेतात पाटाचं पाणी सोडी
गंगू गं गंगू, माझी मैना
राम्या रं राम्या बघ जरा ऐना।।”

भलरी गीतांतून थट्टामस्करी, प्रीतीचा भाव, प्रेमजाणिवा, रंगेलपणा, उपहास यांचे संमिश्रण पहायला मिळते. या गीतांतून सामूहिक आनंद सर्वजण घेतात. स्त्रियांसुद्धा श्रमाची, कष्टाची कामे करतांना नात्याच्या व गणगोताच्या संदर्भाने भावना व्यक्त करणारे गीत गातात. गणगोताचा पसारा कितीही असला तरी आईशिवाय खरं गणगोत किंवा समजून घेणारे कोणीच नसते, अशा आशयाने एक स्त्री गीत गाते,

“गोता मंदी गोत, काय करायचं गोताला
एक माऊली वाचूनी, कुणी धरीना हाताला।।”

खात्यापित्या, घरात कर्त्या पुरुषाच्या घरात लेकमात देऊन आई-वडिलांना वाटतं की, आपली लेक सावलीत, सुखात नांदेल. पण आई-वडिलांना मुलीचा

सावलीतला सासुरवास कळतो तेव्हा आईला फार दु:ख होते. हे दु:ख मुलगी आपल्या गीतातून व्यक्त करते,

"जीव माझा गेला, सरण जळतंय सावलीला
दु:ख झाले माझ्या माऊलीला।।"

अशा अनेक लोकगीतांतून श्रमिक, कष्टकरी, दलित स्त्रियांचे भावविश्व प्रकट झालेले दिसून येते.

## ३.४ विधी गीते :

मानवी जीवनात समूहजीवनातील उत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जन्मापासून ते मरणापर्यंत अनेक विधी-उत्सवांमधून तो आंनद सोहळे साजरे करत असतो. अशा उत्सवांमध्ये दलित-आदिवासी, भटके, कष्टकरी, शेतकरी मोठ्या आनंदाने सहभागी होत असतात. त्यांच्या जीवनात असे विधी उत्साह निर्माण करत असतात. फायदा-तोटा असा तो यावेळी कोणताही विचार करत नसतो.

"लोकजीवनात प्रामुख्याने धर्मविधी व संस्कारविधी पाळल्या जात असल्या तरी निरनिराळ्या जाती-जमातीत त्यांच्या जीवन जगण्याच्या पारंपरिक वैशिष्ट्यांनुसार अनेक विधी पाळल्या जातात. या विधीचे आचरण केले नाही तर आरिष्ट येते, जीवनात सुख-समाधान मिळत नाही, असा समज लोकमानसात दृढ झालेला असल्याने परंपरेने चालत आलेल्या विधी प्रथा पाळण्याकडे लोकांचा कल असतो. या विधींना धर्माचे अधिष्ठान लाभलेले असल्याने पाप-पुण्याची कल्पनाही त्यामागे आहे. त्यामुळे या विधीचे आचरण लोक श्रद्धेने करतात."[१०]

विशेषत: ग्रामीण भागात मुलांच्या जन्मानंतर सटवाई पुजनाचा विधी हा हमखास केला जातो. सटवाई मुलाचे नशीब लिहिते, असा गैरसमज आहे. सटवाईला खूष नाही केले तर सटवाई नशिबाचा लिखा चांगला लिहित नाही, म्हणून सटवाई पुजनाचा विधी होतो. सटवाई विषयी श्रद्धा व्यक्त करणाऱ्या स्त्रिया गीत गातात ते पुढीलप्रमाणे

"माय सटवाई सटवाई
रानात तू गं राही

नशीब बाळाचं लिही
पूजा मी बांधिते आई सटवाई
राजाचं सुख आन् सम्रत बाळा आई।।”

अशाच प्रकारची धुरपतमाईची धूपआरती पोतराज गातो. गावावर, शिवारावर संकट येऊ नये, काही कोप होऊ नये, रोगराई येऊ नये, दुष्काळ पडू नये यासाठी पोतराज धुरपतमाईची धूपआरती गातो ती पुढीलप्रमाणे

“आ... हो...
आधी नेमु माता...
मंग नेमु पिता...
मंग नेमु सद्‌गुरुच्या पाऊतका...
आठवावं देवाशी...
त्यानं आमा घातलं जल्माशी...
जल्मा घेऊनी अनार्था...
कर्म लिहिलेत लिखा...
कर्म लिहिलेत रघुराज...
आम्ही झालोत पोतराज...
जल्म घेऊनी माताच्या कुशी...
माता म्हणले तीर्थ काशी...
पिता म्हणले भगवान...
फार केले जयजयकार...
नाही फिटले उपकार...
आम्ही होतो अनवळ...
फार काढिली वर्दळ...
गुरू म्हंजीच गिनानाचं घर...
म्हणून हे अंजान पोतराज...
नित लोळतो चरणावर...”[११]

“आरणूस माता...

परणूस पिता...

सप्तीमुख...

सप्ती जिवबा...

येईल मी सदाशिवा...

हरा हरा वळल्या वाती...

पाजळल्या जोती...

गणानं गण भजना...

चवदा विद्याच्या नंदना...

हाती घेऊन लाडवाची वाटी...

वाकडी सोंड फिरवून गोमटी...

सिरी सेंदूर सोबती...

सिरी सारजा...

सारजानं सुंदरी...

मुकी वेद बरम्याच कैवारी...

चंद्र न सुर्वे दोनी...

गेले गंगाच्या संगमावरी...

जागा पाहून निर्मळ...

तिथं टाकील साशानं...

ऐसा करतो चिंतन...

सकळीक देवा...

नित लोळतो चरणावरती”[१२]

वरील धुपआरत्या ‘पट फोडतांना’ किंवा ‘कारण’ करताना गायिल्या जातात. तसेच संपूर्ण महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या तुळजापूरच्या आईचा गोंधळही सर्वत्र घातला जातो. तसा परभणी जिल्ह्यातही गोंधळाचा विधी केला जातो. गोंधळ

घालण्यापूर्वी गोंधळास येण्याचे सर्व देवतांना आवाहन करणे या अर्थाने विधीगीत पुढीलप्रमाणे असते.

“तुळजापूरचे भवानी आई गोंधळाला यावे
कोल्हापूरचे लक्ष्मीआई गोंधळाला यावे
माहुरचे रेणुकामाते गोंधळा यावे
गोंधळ मांडिला, गोंधळा यावे।।”[१३]

गोंधळासारखा एक लोकविधी म्हणजे ‘डहाक’ किंवा ‘डाक’ वाजविण्याची प्रथा आजही आपल्याला पहायला मिळते. हा ‘डहाक’ मुंजा या देवतेच्या उपासनाविधीत येतो. घराच्या बाजूला पिंपळाच्या झाडाखाली गोल दगडांना शेंदूर फासून मुंजा ही देवता बसवली जाते. या देवतेच्या नावाने कुंभार, आपल्या सहकाऱ्यासोबत वाद्य वाजवून रात्री जे गीत गातो, त्यांना ‘डहाकाची’ विधीगीते म्हणतात. मुंजा, नृसिंह आणि कामाई या देवतांच्या नावाने रात्री उशिरा गीते गायिली जातात. एक गीत पुढीलप्रमाणे आहे.

“आत्मा टाकून गेला कुडी
कुडीला इचारिना कुणी
तुटली सर्गाची दोरी
करू नको अनवाणी”[१४]

अशा वेगवेगळ्या गीतांमधून लोकदेवता, कृषीकर्म, उत्सव, जन्म-मृत्यू, लग्न, गर्भधारणा, मुलींचा ऋतूमास अशा जीवनाच्या वेगवेगळ्या अवस्थेतील व प्रसंगानुरूप विधीगीते गायली जातात. यामध्ये दलित समुहाचाही फार मोठ्या प्रमाणात सहभाग आढळून येतो.

विधीगीते मानवी मनाला आधार देणारी असून, पाप-पुण्याचा व सामाजिक कर्तव्यपूर्तीचा आधार घेऊन ती निर्माण झालेली असतात. या गीतांमधून मानवी समूह एकत्र येतो. स्त्रिया, पुरुष, मुलं सर्वच समाज जीवनातील माणसांना प्रसंगानुरूप या गीतांच्या माध्यमातून एकत्र येण्याचा योग निर्माण होत असतो. म्हणूनही विधीगीते मानवीसमाजात आजही तेवढीच महत्त्वाची मानली जातात. दलित समाजात सामाजिक

परिवर्तन होत असून, शिक्षणाचे प्रमाण वाढत असल्यामुळे या गीतांचे महत्त्व हळूहळू कमी होऊ लागले आहे. लोकगीतांमध्ये विधीगीते ही निसर्गाच्या प्रतिकूल अवस्थेतून निर्माण होणारे संकट टळावे या उद्देशातून निर्माण झालेली असतात. भय आणि अज्ञान या दोन्ही प्रवृत्तींमधून माणूस स्वत:ला सुरक्षित करण्यासाठी ही विधीगीते विविध देवता आणि उपासना दैवत यांना समोर ठेवून विधीगीतांचा वापर करतो.

## ३.५ लोकरंजनपर गीते :

रंजन ही मनाची आंतरिक गरज असून लोकजीवनात रंजनासाठी अनेक गोष्टीचे प्रयोजन असते. आदिम काळापासून लोकसाहित्यातून लोकरंजनाची परंपरा असून लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते इत्यादी मौखिक वाङ्मयातून लोकरंजन घडतांना दिसते. दलित समाज हा मुळातच सर्वहारा असला तरी त्याचे सांस्कृतिक जीवन मात्र समृद्धतेने नटलेले दिसून येते. दलितांमध्ये रायरंद, बहुरूपी, पांगूळ, भोपे, वाघे, मुरळी, पोतराज इत्यादी लोककलावंत लोकसाहित्याच्या माध्यमातून लोकरंजन करताना दिसून येतात. यापैकी रायरंद हा पूर्वाश्रमीच्या महार समाजाचा मागता (आश्रित) असून हा रायरंद अनेक विनोदी गाणी गावून महारवाड्यातील महारांचे रंजन करतांना दिसून येतो. उंटावर आपला संसार लादून रायरंद पूर्वी सुगीच्या दिवसांमध्ये महारवाड्यात येत असत. रायरंद हे फक्त महारांच्याच घरी मागून खाणे पसंत करतात. लहानपणी प्रस्तुत संशोधकाने ऐकलेले रायरंदाचे गाणे असे -

“लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला
साळूबाई, काळूबाई लग्नाला चला
वडवाड्यावरची गीताबाई, मांगवाड्यातील झुंगाबाई
लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला
शेषाबाई, सुंदरबाई घाई आता करा
लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला
लेकरं बांधा खांबाला, कुत्रे घ्या कडेवर
बकरे घ्या काखेला लग्नाला चला
सासरा ठेवा सांदीला, सासू अडका खुंटीला

नवरा बांधा पदराला लग्नाला चला."[१५]

वरील लोकगीतातून जसे आबालवृद्धांसह समग्र गावकऱ्यांचे मनोरंजन रायरंद करत असतो. त्याचे हे सादरीकरण साभिनय असल्यामुळे ते अधिकच प्रभावी ठरते. तर लहान मुलांसाठी खेळगीत मनोरंजनाचे खूपच मनोरंजक अभिव्यक्ती प्रकट करतात. जसे की -

"वाटी बाई वाटी, बेसणाची वाटी
मेल्यानं मारलं तंबाखुसाठी
मेल्यानं मारलं तंबाखुसाठी बाई तंबाखुसाठी
उलटली साठी, लागला पाठी
घेतली काठी, बाई लागला पाठी"[१६]

आपल्यावर पारंपरिक व्यवस्थेने लादलेले दु:ख कमी करण्यासाठी दलित समाजामध्ये लोकरंजन करणाऱ्या कलावंतांचे मोठे महत्त्व होते. स्वत: सवर्णांकडून वेळप्रसंगी मागून आणून आपल्यावर अवलंबून असणाऱ्या रायरंद, बहुरूपी, डक्कलवारांसारख्या मागत्यांचा उदरनिर्वाह करण्याचे काम महार-मांग दलित समाजाने केले आहे. दिवसभराच्या कामानंतर संध्याकाळी महार चावडीवर किंवा मांग वेटाळात एकत्र जमून केल्या जाणाऱ्या गावगप्पांमधून हास्यविनोद करीत आपल्या दु:खी जीवनाला सुखाची किनार लावण्याचे काम दलित करत असत. वरील लोककलावंताबरोबरच आराधी, वाघे, मुरळी, गोंधळी, पोतराज आदी देव-देवतांच्या भगताकडूनही लोकरंजन करणारी गाणी गायली जातात. एवढेच नव्हे तर अलिकडील काळात सामाजिक प्रबोधनपर म्हणून गायल्या जाणाऱ्या साठे-आंबेडकरी जलशातही प्रबोधनाबरोबरच हलकी-फुलकी विनोदी गाणी गावून लोकरंजन साधले जाते. या लोकगायकांकडून दु:खी कष्टी दलितांचे जीवन काही काळासाठी तरी हास्याने भरून येते. जगण्याची नवी पालवी जीवनाला फुटते.

## ३.६ आंबेडकरी लोकगीते :

भारतीय समाजामध्ये लोकगीताला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार ग्रामजीवनातील महत्त्वाचे लोक असायचे. या सर्वांचे मनोरंजन आणि उपासना पद्धतीची भूक भागविण्याचे कार्य लोककलावंत लोकगीताच्या माध्यमातून करत असत. सामाजिक बदलांमुळे लोकगीतांचे स्वरूपही बदलत असते. लोकगीतांची रचना आणि आशयमूल्यही परिवर्तीत होते. याच आशयाच्या संदर्भाने लोकसाहित्याचे संशोधक डॉ.प्रभाकर मांडे म्हणतात, “लोकगीते सामूहिक असल्यामुळे त्याची रचना पूर्ण झाली असे कधीही होत नाही. सतत वाढ होणे, परिवर्तनशील राहणे हा त्याचा धर्म असतो. लवचिकपणा हा त्याचा गुण असतो. लिहिलेल्या संहितेत हे शक्य नसते. म्हणून मौखिक परंपरा ही लोकगीताच्या मुळच्या प्रकृतीला अबाधित ठेवण्यास सहाय्यभूत ठरते. लोकगीताचे पुनर्निर्माण हे मौखिक परंपरेमुळेच घडते. त्याचा मूळचा गाभा कायम ठेवण्याचे कार्यही मौखिक परंपरेमुळेच शक्य होते.”[१७]

१९५६ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केल्यामुळे दलित समाजाच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला. पारंपरिक जीवनशैली तो नाकारू लागला. शिक्षणामुळे तो व्यवस्थेची, परंपरेची चिकित्सा करण्याचे आणि नवी मांडणी करून, नवे जीवनसंदर्भ निर्माण करण्याचे त्याने प्रयत्न केले.

लोकप्रबोधनाच्या चळवळीसाठी त्याने गीतपरंपरा निर्माण केली. पारंपरिक लोकगीतांचा आधार घेऊन दलित समाजाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन लोकगीते निर्माण करण्याचा आणि समाजात रूजवण्याचा प्रयत्नही केला. त्यामुळे आज दलित समाजात धर्मांतरीत झालेल्या नवबौद्धांची आणि हिंदू दलितांची विचारधारा आणि उपासनापद्धती यामध्ये आंतर निर्माण झाले. तरीही महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना प्रेरणा मानणाऱ्या लोककलावंतांनी लोकांसाठी जी प्रबोधनाची गाणी रचली ती लोकांचीच झाली, तीच आज आंबेडकरी लोकगीते म्हणून पुढे येत आहेत. यासंदर्भाने आंबेडकरी जलशाचे संशोधक डॉ.भगवान ठाकूर म्हणतात, “विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात फुले-आंबेडकरी सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय धम्मसंगरात स्त्री-शुद्रातिशूद्रांच्या स्वोद्धारासाठी, स्वत्व, स्वाभिमान आणि अस्मिता जागरासाठी लोकप्रबोधनाच्या कला माध्यमांनी विशेषतः शाहिरी, पोवाडे, जलशांनी

अक्षरशः रान उठविले. लोकजागृती, लोकशिक्षण, लोकप्रबोधन, लोकसंघटन आणि अंतिमतः लोककल्याणाच्या हेतूने या काळात जेवढ्या मोठ्या प्रमाणात लोककला, लोकनाट्य, तमाशा, शाहिरी, लावण्या, पोवाडे, अखंड, फार्स, वग, पदे, कवने आणि गीतादी आविष्कार प्रकाराचा वापर करून घेण्यात आला तेवढा जागतिक इतिहासात स्वजनोद्धारासाठी अन्य कोणीही केलेला दिसून येत नाही."[१८]

भगवान ठाकूर यांच्या चिंतनानुसार देशात सर्वत्र परिवर्तनाच्या वातावरणात महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात झाला होता. तशी महाराष्ट्रभर तर सुरुवातच या विचाराने झाली होती. लोकगीतावरही त्याचा खूप मोठा परिणाम झालेला दिसून येतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मामुळे दलितांचाच नव्हे तर जगातील समस्त शोषितांचा कसा उद्धार झाला हे सांगताना भीमशाहीर वामनदादा कर्डक म्हणतात,

"उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे
जखडबंद पायातील साखळदंड
तटातट तुटले तू ठोकताच दंड
झाले गुलाम मोकळे
भीमा तुझ्या जन्मामुळे."[१९]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी दलित शोषितांचे अवघे जीवनच बदलून गेले. तो भीम कसा होता सांगताना वामनदादा कर्डक म्हणतात,

"काय सांगू तुला आता
भीम माझा कसा होता
लेकराला जसी माता
भीम माझा तसा होता
झुंज देऊन काळाशी
सात कोटी गुलामांचा
उंचविला इथे माथा
भीम माझा असा होता

रास लावून ज्ञानाची, वाटली ती गरिबांना
पाहिला ना तो पामराला पसा होता
अंत:करणाच्या पाटीवर, दीनदुबळ्या समाजाच्या
युगे युगे जो राहील, तो भीम माझा ठसा होता
काय सांगू तुला वामन, भीम माझा कसा होता
सात ठिगळांच्या बंडीचा, भीम माझा खिसा होता"[२०]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या जीवनात सुज्ञानाचा नवा प्रकाश आणला. बुद्धाचा धम्म देऊन १९५६ ला बाबासाहेबांचे निर्वाण झाले तेव्हा समाजाची चिंता वाहणारे शाहिर वामनदादा लिहितात,

"कोण राखील आता भिमाचा मळा
वाळुनी चालला हा उभा जोंधळा
शेत सोडून जाता धनी मावळा
सोनियाच्या स्थळा पातली अवकळा
माल करपून जाता असा कोवळा
मोट मोडून बसला गडी बावळा
पाणी देईल कसा रे आता
राखणारा जत्था हा लुळापांगळा
जीव जाळीत सुटल्या उन्हाच्या झळा
बोलती रोपट्यांनो जळा जळा
रानढोरांचा येता जत्था वेगळा
कोवळे कोंब कापती हे चळचळा
पीक पदरात पडण्याच्या आधीच का
चालला आज वामन तुझा हा विळा
पीक नाही रे हा भीमाचा गळा
कापशी काय रे, कारे झाला खुळा
कोण राखील आता भीमाचा मळा."[२१]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर झालेली अराजकाची स्थिती वरील गीतातून दिसून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखा नेता पुन्हा कधीच लाभला नाही, झाले ते नेते पोटभरूच निघाले. अंधारयुगाचे सावट पुढे अनेक वर्ष राहिले. परंतु लवकरच शाहिर कलावंतानी क्रांतीची मशाल हातात घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जग बदलण्याचे तत्त्वज्ञान लोकगीतांतून गायले. लोकनायक अण्णा भाऊ साठे लिहितात,

"जग बदल घालूनी घाव
सांगूनी गेले मला भीमराव
गुलामगिरीच्या या चिखलात
रुतून बसला का ऐरावत
अंग झाडूनी निघ बाहेरी
घे बिनीवरती धाव
सांगून गेले मला भीमराव"[२२]

अण्णाभाऊंचाच वारसा सांगणारे महाराष्ट्र शाहिर विठ्ठल उमप यांची शाहिरीही परभणी जिल्ह्यात आवर्जून गायली गेली. शाहिर लिहितात,

"गोरगरीबांचा भीम दाता भेटला
नाथ रमाईचा माझा त्राता भेटला
तसबीरीत होता पण नाही बोलला
पुस्तकात आवर्जुन स्वत: भेटला
आली जीवनात आज खरी नवकळा
आम्हा जीवाचा उद्‌गाता भेटला
हयातीत माझ्या असा नाही गवसला
नव्या जीवनाचा निर्माता भेटला
पिंपळाच्या तरुतळी शांती लाभली
गीत विठ्ठलाचे गाता गाता भेटला."[२३]

मातंग समाजात जन्म घेऊन बौद्ध धम्माचा स्वीकार केलेले लोकशाहीर विठ्ठल उमप हे कलेशी इमान राखून दलित-शोषितांसाठी अखेरच्या श्वासापर्यंत गात राहिले. या शाहिरांचा वारसा घेऊन परभणी जिल्ह्यातील गायक, कवी व कलावंतांनी आंबेडकरी लोकगीते गावा-शहरातून सादर करत परिवर्तनाचा जागर घातल्याचे दिसून येते.

अलिकडे नवबौद्धांच्याकडे असलेली परिवर्तनाची चळवळ आता मातंग तरुण आदर्श मानून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांच्या जयंत्या साजऱ्या करू लागला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील आणि अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनावरील लोकगीतांच्या माध्यमातून मातंग तरुण समाजात प्रबोधनाच्या चळवळी निर्माण करत आहेत, हे आंबेडकरी लोककलावंतांचे यश मानावे लागेल.

❑❑❑

**संदर्भ**


१) व्यवहारे शरद, लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास, विश्वभारती प्रकाशन, धनवटे चेम्बर्स सीताबर्डी, नागपूर - ४४० ०१२, पृ.क्र.३१

२) कित्ता, पृ.क्र.३१

३) कित्ता, पृ.३२

४) व्यवहारे शरद, लोकसाहित्य (संकल्पना स्वरूप), तिरूपती प्रकाशन, लोकमान्यनगर, परभणी, द्वितीय आवृत्ती १६ डिसेंबर २००४, पृ.क्र.९१

५) कित्ता, पृ.क्र.९२

६) कित्ता, पृ.क्र.९२

७) कित्ता, पृ.क्र.९२

८) कित्ता, पृ.क्र.९२

९) कित्ता, पृ.क्र.९३

१०) कित्ता, पृ.२२८

११) भिसे गणपत, धुपात्री, जनशक्ती वाचक चळवळ, पिनाक, २४४, समर्थनगर, औरंगाबाद ४३१००१ प्रथमावृत्ती ५ जानेवारी २०१२, पृ.क्र.१००

१२) कित्ता, पृ.क्र.१२

१३) व्यवहारे शरद, लोकवाङ्मय : रूप-स्वरूप, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९९१, पृ.क्र.४०

१४) कित्ता, पृ.क्र.४४

१५) प्रस्तुत संशोधकाने मौजे रामपुरी (बु.) ता.मानवत जि.परभणी येथे रायरंदाकडून ऐकलेले गीत

१६) व्यवहारे शरद, लोकवाङ्मय : रूप-स्वरूप, उ.नि., पृ.क्र.५६

१७) मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, परिमल प्रकाशन, परिमल प्रकाशन, खडकेश्वर, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९९८, पृ.क्र.२४९

१८) लुलेकर डॉ.प्रल्हाद, आंबेडकरी जलसे, डॉ.भगवान ठाकूर, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जुलै २०१०५, पृ.क्र.१८६.

१९)	कर्डक वामन, मोहळ, शब्ददान प्रकाशन, सविता नगर, तरोडा, नांदेड, द्वितीयावृत्ती १४ एप्रिल २०१४, पृ.क्र.१४

२०)	कित्ता, पृ.क्र.२०

२१)	कित्ता, पृ.क्र.३१

२२)	डांगळे अर्जुन, संपादक, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९८, पृ.क्र.६३

२३)	खडसे खुशाल, जागतिक कीर्तीचे लोकशाहीर विठ्ठल उमप, नेहा प्रकाशन, १२०, गुरूनानकपुरा, बेझनबाग, नागपूर, प्रथमावृत्ती १४ एप्रिल २०१२, पृ.क्र.५४-५५

# प्रकरण चौथे

# परभणी जिल्ह्यातील दलितांची लोकगीते : संकलन आणि आकलन

## ४.१ प्रास्ताविक :

परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीतांच्या संशोधन प्रकल्पांतर्गत अभ्यासलेल्या लोकगीतांचे वाङ्मयीन दृष्टीने संकलन करून आकलन करताना वेगवेगळ्या कलावंतांनी व समाजातील व्यक्तींनी सादर केलेल्या लोकगीतांचे मूल्यमापन केले आहे. लोककलावंतांनी दलित समाजाच्या मनोरंजनाबरोबरच परिवर्तनाचेही गीते सादर केलेली पहायला मिळाली. परभणी जिल्ह्यात दलित समाजाबरोबरच अल्पभूधारक शेतकरी, बारा बलुतेदार, अठरा अलुतेदार, भटका माणूस आजही स्वातंत्र्यानंतर अनेक समस्यांना तोंड देतांना दिसून येतो. परभणी जिल्ह्यातील कसदार शेती असूनही सर्वच समाज घटकात दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, बेकारी मोठ्या प्रमाणात पहायला मिळते. या सर्व समाज जीवनाचे दु:ख, दारिद्र्य, अज्ञान नाहीसे व्हावे यासाठी दलित कलावंतांनी मनोरंजनाबरोबच परिवर्तनाची लोकगीते सादर केलेली आहेत. या सर्व लोकगीतांचा वाङ्मयीन दृष्टीने या प्रकरणात आढावा घेण्यात आला आहे.

परभणी, सेलू, पाथरी, सोनपेठ, मानवत, पूर्णा आदी तालुक्यातील लोककलावंतांच्या व व्यक्तीच्या संवादामधून व मुलाखतीमधून संकलीत केलेल्या लोकगीतांचे वाङ्मयीन दृष्टीने मूल्यमापन या प्रकरणात करण्यात आले आहे.

## ४.२ लोककलावंत के.आर. बुरखुंडे :

सेलू तालुक्यातील डिग्रस जहागीर येथे के.आर. उर्फ कचरू रामा बुरखुंडे यांचा जन्म महार कुटुंबात झाला. धर्मांतरानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रेरणेमुळे शिक्षणाचा मार्ग कळाला. बाप पोतराज असूनही कचरु बुरखुंडे भिक्षा मागता-मागता शिक्षणाची कास धरून महाविद्यालयीन शिक्षण घेऊन पदवीधर झाले. पदवीनंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्म चळवळीचे आणि सामाजिक परिवर्तनाचे विचार स्वीकारून समाजात आपण काहीतरी केले पाहिजे, या उद्देशातून पोतराजाची गाणी गात-गात परिवर्तनाची गाणी गायला सुरूवात केली. आपले संपूर्ण जीवन गायन

कलेला वाहून घेतलेला हा लोकशाहीर दलित, कष्टकरी, बहुजनांच्या समस्यांवर गीतरचना करून सामाजिक प्रबोधनाबरोबरच लोकमनोरंजनही करत असतो. पाथरी येथील इंदिरानगर सारख्या भागात राहून लोकसेवा करण्याचे व्रत घेतलेले शाहीर बुरखंडे आपल्या गीतांतून दलित, कष्टकरी, बहुजन समाजापर्यंत प्रबोधनपर लोकगिते पोहोचविण्याचे सामाजिक कार्य करताना म्हणतात,

“गौरवशाली या महाराष्ट्राची। घासून लावली धार ती
चमकत होती चमकत राहिल। शिवबाची तलवार ती
मर्द मराठा बलशाली तो। कधी कुठे झुकला नाही
पटाईत होता तलवार निशान कधी तो चुकला नाही
क्रांतीकारी शूरविरतेची छापू द्या या भारती
चमकत होती चमकत राहिल। शिवबाची तलवार ती।।”[१]

दलित कष्टकरी, शेतकरी यांच्या अस्तित्वासाठी लढणारा स्वाभीमानी राजा बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व वरील गीतातून शाहीर बुरखुंडे व्यक्त करतात. ज्या राजांनी शोषणरहीत व न्यायाचे राज्य चालवले त्या राजाचा इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहचवण्याचे कार्य या गीतातून प्रकट होते. ब्राह्मणी वर्ण व्यवस्थेने शूद्र-अतिशूद्रांचा शिक्षणाचा हक्क नाकारला होता. ब्रिटीश काळात महात्मा जोतीराव फुले यांनी महाराष्ट्रातील दलित-कष्टकरी-शेतकरी या अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी फार मोठे आंदोलन करून दलितांच्या जीवनातील अंधार दूर केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना आपले गुरू मानले. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी राजे यांची समाधी शोधून त्यांच्या जीवनावर पहिला पोवाडा महात्मा जोतिराव फुले यांनी रचला. अशा महान समाजसुधारकाचे गुणवर्णन करणारे लोकगीत महाराष्ट्रात जसे गायीले जातात तसे परभणी जिल्ह्यातही गायीले जातात. शाहीर बुरखुंडे यांनी गायीलेले हे गीत,

“आले जन्माला महात्मा जोतीबा फुले
आले जन्मा महात्मा जोतीबा माळी
आता संपली रात काळी

त्यांनी जागवली जनता भोळी
जातीयतेची केली होळी
दीनाचा वाली जोतीबा माळी
ज्ञान ही शोधूनी दिले
आले जन्माला महात्मा जोतीबा फुले."[२]

महात्मा जोतीराव फुले यांनी दलितांच्या कष्टकरी, शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी शैक्षणिक चळवळ उभारली, सामाजिक कार्य केले आहे त्यामुळे या समाजात अज्ञानाचा आणि दारिद्र्याचा नाश करण्याची ऊर्जा निर्माण होते या आशयाचे वर्णन वरील गीतांमध्ये करण्यात आलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्यावर भारतभर जसी लोकगीते तयार झाली, तसीच परभणी जिल्ह्यातही लोकगीतांची निर्मिती लोककलावंतांनी केली आहे. शाहीर बुरखुंडे यांनी निर्मिलेले लोकगीत खालीलप्रमाणे पाहुयात,

"हेऽऽ भिमानं दिलं शिक्षणं। पेन हाती आलीया
शिकून सारी पोरं मोठ्या पदावरं गेलीया
कुणी गाडीवर फिरतीया। कुणी ऐटीत रहातीया
पोरी बघऽऽ बघऽऽ। पोरी बघऽऽ बघऽऽ ।।धृ।।
आमच्या आजा-आजीचं जीनं गुलामीत गेलं
होत कुत्र्यावाणी जीनं आम्हा माणूसही केलं
जुनं सारं गेलं। आता नवीन आलंया
हे पोरी सुटबूट घालूनी। रस्त्यानं चालूया
साऱ्या जनात ठेवा ध्यानात साहेब दिसतंया
साऱ्या गावाचं या लक्ष बघा पोराकडं लागलं
पोरं शिकुनिया बघा कलेक्टर होऊनिया आलंया
गाडीत आलंया चकीत केलंया साऱ्यांना चकित केलंया
साऱ्या पोरात शिकलंया जोरात कलेक्टर झालंया।।"[३]

वर्तमानकाळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने शिक्षण घेतल्यामुळे आज झोपडीतील माणूस कलेक्टर होतो आहे. कलेक्टर झाल्यामुळे गावातील व परिसरातील माणसं कौतुकाने बघत आहेत. सर्वांचे जीवन प्रकाशमान होत आहे. अशी प्रेरणादायी लोकगीते दलित जीवनाला बळ देणारी असतात. वरील दलित लोकगीतांमधून महापुरुषांच्या कार्यकर्तृत्वाबरोबर विचारांचाही आदर्श समाजासमोर ठेवण्याचा कलावंत प्रयत्न करताना दिसून येतात. सामान्य माणसांच्या बोलीभाषेत मांडणी केल्यामुळे ही गीते सामान्यांना समजायला सोपी जातात, आपली वाटतात.

### ४.३ शाहिर कांताबाई ज्ञानोबा मनेरे :

गोदावरीच्या काठावर वसलेले पाथरी तालुक्यातील कान्सूर हे गाव कांताबाईचे. चार बहिणी, एक भाऊ. घरची परिस्थिती बेताचीच. कष्ट करून उपजीविका भागवणे. गाण्याचा छंद लहानपणापासून असल्यामुळे लग्नानंतर पती ज्ञानोबा मनेरे यांनी कांताबाईंना गाण्यासाठी प्रोत्साहीत केले. निरक्षर कांताबाईंनी विष्णू शिंदे यांचे गीत दादर, मुंबई येथे पहिल्यांदा गायिले आणि त्यांच्या जीवनात आत्मविश्वास दृढावला. त्यानंतर पती-पत्नीनी अनेक कार्यक्रमात सहभाग घेऊन गीते गायिली. लोकात रममाण होऊन लोकांसाठी गीत गात समाजसेवा स्वीकारली. कांताबाईची गीते अनेक लोकांना आवडायला लागली. निरक्षर कांताबाई महात्मा फुले, गौतम बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे, माता सावित्रीबाई फुले, माता रमाबाई आंबेडकर यांना आपली प्रेरणा व आदर्श मानतात. त्यांच्या घरी सर्व महापुरुषांच्या प्रतिमा पहायला मिळाल्या. एकच मुलगी असूनही त्यांनी कधी खंत केली नाही. मुलीवर प्रेम करणाऱ्या कांताबाई समाजप्रबोधनासाठी स्त्री-भ्रूण हत्येवरील गीत सादर करतात.

"गर्भामध्ये मारू नका। माय बाप मुलीला
विश्व सारे हे पाहण्यासाठी । येऊ द्या मुलीला
जागे व्हारे भ्रूण हत्या टाळण्याला।।धृ.।।
गर्भलिंग निदान करू नका
कायद्याने गुन्हा हाय बरं का
तुम्ही मुलगा आणि मुलगी। हा भेद करू नका

मुलगी तुमच्या कामी येईल

सेवा ही करण्याला

जागे व्हारे भ्रूण हत्या टाळण्याला।।"[४]

या समाज प्रबोधनाच्या लोकगीताबरोबरच महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरही बरीच लोकगीते निर्माण झाली. शाहिर कांताबाई मनेरे या कलावंत असलेल्या गायिकेने प्रत्यक्ष मुलाखतीत आमच्यासमोर सादर केलेले लोकगीत -

"भीम गेले परदेशी । आस होती ज्ञानाची

विद्येसाठी लावी मी। बाजी अशी प्राणाची"[५]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञान संपादन करण्यासाठी शिक्षण घेत असताना विद्यार्थी दशेत अनेक कठीण प्रसंगांचा सामना केला. देशात सर्वात विद्वान असलेल्या बाबासाहेबांचे महत्त्व या व्यवस्थेला कधी कळलेच नाही. आज बलाढ्य अमेरिकेने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची विद्वत्ता मान्य केली आहे. ही जाणीव सर्वसामान्य दलित-उपेक्षितांना व्हावी, ही प्रामाणिकता वरील गीतातून प्रकट होते. कांताबाईंची सामाजिक जाणीव प्रगल्भ आहे. त्यांनी इतर गीतांमधून लोकप्रबोधन करण्याचा वसा घेतला आहे. परभणी जिल्ह्यातील लोकगीत गाणाऱ्या कलावंतांमध्ये त्यांची आवर्जुन नोंद घ्यावी लागते.

### ४.४ लोकगायिका आशाताई ज्ञानोबा गायकवाड :

आशाताई ज्ञानोबा गायवाड ही गोड गळ्याची सातवी पास असलेली गायिका परभणी जिल्ह्यात सुपरिचित आहे. पाथरी तालुक्यातील डाकुप्रिंपी हे गोदाकाठावरील छोटेसे गाव. वडील ऊसतोड कामगार. शिक्षणाची तीव्र इच्छा असूनही गरिबीमुळे शिक्षण घेता आले नाही. सामाजिक जाणीव लहानपणापासूनच असल्यामुळे लग्नानंतर प्रबोधनपर गायनाचा चांगलाच छंद जडला. पती हार्मोनियम वाजवत असल्यामुळे दोघेही कलावंत समाजप्रबोधनासाठी गायन पार्टीच्या माध्यमातून गात राहिले. सोनपेठ येथे भीमगडावर गेल्यानंतर ताईंच्या घराचे बांधकाम चालू. अंगावर माती, हाताला चिखल मात्र तेवढ्याच आत्मीयतेने त्यांनी आमचे स्वागत केले. एक मुलगा समाधान, दुसरा संविधान दोघेही उत्तम कलावंत. एक हार्मोनियम वादक व एक तबलावादक.

दोघेही महाविद्यालयीन शिक्षण घेतात. अनेक विद्यापीठ महोत्सवात पारितोषिके मिळविलेले. आम्ही लोकगीतांच्या संकलनासाठी सोनपेठ येथे भीमगडावर गेलो असता संविधान, रामेश्वर पाडोळे, सुरेश रंजवे, ज्ञानोबा गायकवाड व आशाताई या सर्व कलावंतांनी भरभरून स्वागत केले व आमच्यासोबत चर्चा केली. अनेक गीते संगीताच्या साथीने आमच्यासमोर सादर केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यकर्तृत्वावर व सामाजिक प्रश्नांवर अनेक लोकगीते निर्माण झाली आहेत. मात्र ज्या माऊलीचा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनात मोलाचा सहभाग आहे, अशा माता रमाईवरील गीताने आम्हाला अंतर्मुख केले. आशाताईंच्या मंजुळ आवाजात सादर केलेले ते लोकगीत असे -

“मनाला मोडूनी हे नाते तोडूनी
गेली का सोडूनीऽऽऽ
तू रमाऽऽऽ तू रमाऽऽऽ।।धृ.।।
केला कसा काळाने घात
अर्ध्यावरती सोडली साथ
कधी ना रडली। स्वतः धडपडली गं
तू रमाऽऽऽ तू रमाऽऽऽ।।१।।
आधार नाही या जीवनात तू गेल्यापाठी
क्षणातच तुटल्या रेशीमगाठी
असे वाटते जणू
हरवली आंधळ्याची तू काठी
दुःख तू साहिले। सुख ना पाहिले
तनमन वाहिले तू रमाऽऽऽ ।।२।।
देऊ कसा मी धीर या मनाला
अर्थ ना उरला या जीवनाला
हृदय फाटते येता आठवणी मला
गुणांची गुणवंती। शिलाची शिलवंती

तू रमाऽऽऽ तू रमाऽऽऽ”[६]

माता रमाईच्या जीवनाचे सर्वस्व असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर माता रमाईसाठी जीव की प्राण होते. रमाईनी कधीच बाबासाहेबांना आपले दु:ख कळू दिले नाही; ना कोणतीही कधी मागणी केली नाही. उदात्त मनाने सर्वस्व अर्पण करून, आहे त्या परिस्थितीमध्ये रमाईने बाबासाहेबांबरोबर संसार केला. रमाईच्या निर्वाणानंतर हे सर्व बाबासाहेबांना कशा पद्धतीने सहन करावे लागले असेल, याचे यथार्थ चित्रण वरील लोकगीतामध्ये पहायला मिळते. दलित समाजाचे मसिहा असलेले बाबासाहेब आणि त्यांच्या जीवनात रमाईचे महत्त्व या सर्व भावनांचा आविष्कार वरील गीतांमधून दिसून येतो. बोलीभाषेत गीतरचना असल्यामुळे सामान्य माणसाला त्या गीताचा भावाशय व अर्थ लवकर लक्षात येतो. आशाताई यांनीही एक गीत स्वत: रचलेले आहे ते असे -

“स्त्री जातीच्या मुक्तीसाठी जन्मा आले महात्मा फुले
शिक्षण केले खुले-मुलींना शिक्षण केले खुले।।धृ.।।
आज देशामध्ये शिकतात स्त्रिया अन् पोरी
चहुकडे हुशार झाली जनता आज ही सारी
होती ती गंधी-रुढी अंधी
आले धाऊन महात्मा फुले।।१।।
सावित्रीची पुण्याई मोठी, शिकविल्या मुली कोटी
झटली शिक्षणासाठी, प्राण पणाला लाऊन कसोटी
हे संविधान सर्वा समान दरवाजे खुले केले।।२।।
खरी शिक्षणाची देवता सावित्री माता होती
म्हणून झाली या देशाची एक स्त्री राष्ट्रपती
सावित्री होती म्हणून आशा गाती
गीत शिक्षणाचे गाईले।।३।।”[७]

भारतीय शिक्षण परंपरा शुद्रांना आणि स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नाकारते. ब्राह्मणी व्यवस्थेला प्रत्यक्ष विरोध करून आधुनिक भारतात शूद्र-अतिशूद्र आणि

स्त्रियांच्या शिक्षणाचा पहिला लढा महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी लढला. सावित्रीबाई फुले यांनी प्रचंड यातना व अवहेलना सहन करत पहिली शिक्षिका होऊन मुलींना शिक्षण देण्याची जबाबदारी यशस्वी केली. त्या सावित्रीमाईंचे गुणवर्णन वरील गीतामध्ये प्रकट झालेले आहे. थेट सामान्य जनतेशी संवाद होईल अशा शब्दात वरील गीत रचना दिसून येते. नाद, लय, सुरांच्या साथीने आशाताई गायकवाडांनी अनेक लोकगीतांना आपल्या सुमधूर आवाजाने सजवून लोकसंस्कृती टिकवून ठेवण्याचा चांगला प्रयत्न केला आहे.

### ४.५ लोककलावंत प्रल्हाद सखाराम घोडे :

सेलू येथील सर्वोदय नगरामध्ये एक लोककलावंत रहातात, त्यांचे नाव प्रल्हाद सखाराम घोडे. त्यांच्या मुलाखतीसाठी त्यांचे घर गाठले तेव्हा त्यांनी हसतमुखाने स्वागत केले. आम्ही लोककलावंतांकडून लोकगीत संकलनासाठी आलो आहोत असे सांगताच वृद्ध प्रल्हाद बाबा अंगात दहा हत्तींचे बळ संचारल्यासारखे उठले, दुसऱ्या खोलीत आम्हाला बोलावले. पेटी, तबला, मृदंग, टाळ, छनी, एकतारी, धीमडी हे सर्व साहित्य पाहून खूप कौतुक करावं वाटलं बाबांचे. लगेच जाधवकाका, शाहीर आठवे यांना बोलावून घेतले. चहा केला. स्वतः बोलत गेले. १९७२ साली शाळा सोडली. वडील एकतारीवर भजन म्हणायचे. नाथपंथी, कबीरपंथी, तुकडोजी महाराज, देहावरची भजने ही सर्व आमच्या घरात गायली जायची. मूळ गाव आष्टीजवळ दैठणा ता.परतूर. शाळा सोडल्यानंतर सेलूला कामासाठी आलो आणि इथेच स्थिर झालो. भजनाचा आणि गायनाचा नाद असल्याने मातंग समाजात मला आदराने बोलावतात असे ते सांगत होते. सोबत सदाशिव संभाजी जाधव महाराज, आठवे शाहीर, प्रा.डॉ.मारोती कसाब आम्ही सर्व लोककलेवर चर्चा सुरू केली आणि प्रल्हादबाबांनी गायला सुरूवात केली.

"सरली प्रीती सरली नाती
खेळच सरला सारा
पाखरा तुफान सुटला वाराऽऽऽ।।धृ.।।
भयानक गरजत वादळ सुटले

आता कुठला थारा

पाखरा तुफान सुटला वारा।।१।।

मुळापासून झाड उपटले

मोडले घरटे फारच रडले

भयानक गर्जत वादळ सुटले।।२।।”[८]

मानवी जीवनाचा शेवट म्हणजे मृत्यू हे अंतिम सत्य आहे. जीवंत असेपर्यंत प्रेम, द्वेष, शत्रूत्व, मैत्री, नाते, संपत्ती, मोह या सर्व भावनाशी तो जुळवून घेतो. जन्मानंतर मृत्यू हे अटळ आहे तरीही माणूस चुकतो. मृत्यूवारा तुम्हाला कस्पटासारखं उलगद उडवून नेतो. म्हणून माणसाने मानवी जीवनात नातेसंबंध, मैत्रीभाव, सेवाभाव, दानत्व या सर्व गोष्टींची जाणीव ठेवून वर्तन केले पाहिजे. असा वास्तव विचार प्रकट करण्याचा हेतू वरील गीतांमध्ये दिसून येतो. अशी लोकगीते मनोरंजनाबरोबर विचारही देतात. जीवनाचे महत्त्व पटवून सांगतात. जन्म-मृत्यूच्या लोकगीतामधून माणूस सावध होतो. तारुण्यामध्ये तो कोणाचेही ऐकत नाही. म्हातारपणामध्ये तो हतबल होत असतो. अशावेळी जीवन आठवते. अशाच आशयाचे एक गीत ते सादर करतात ते असे -

“म्हातारपण हे आल्यावरती

अशी दैना झाली

पंख फुटल्यावर सारी पाखरं

भुर्रकन उडून गेली

हल्लीची पोरं आईबापाला विसरली।।धृ.।।

काही केले आम्ही पाप

झालो पोरांचे मायबाप

आमच्या करणीचा येतो संताप

चंदनापरी ही काया झिजवून।।१।।

काही तरुणी झाल्या कन्या

उडवून गेल्या चिमण्या

जागेवरती मरून पडावे

अशीही झाली दैना।।२।।

हा सायेब झाला मोठा

मोजीत राही नोटा

वेळेवर हा अन्न देईना

त्या आईबापाच्या पोटा

हल्लीची पोरं आईबापाला विसरली।।३।।"[१]

वर्तमानामध्ये कुटुंबपद्धती बदलत आहे. त्यामुळे समाजमनावर दुभंगलेल्या विचाराचा आणि संस्काराचा प्रभाव वाढत आहे. आई-वडील मुलांचे लाड करून लहानाचे मोठे करतात आणि म्हातारपणात बायको आणि लेकरं घेऊन, मायबापाला सोडून रहाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशा परिस्थितीची चिंता करणारे हे लोकगीत सामाजिक जाणीव प्रकट करते. दलित समाज तर कष्टावर जगणारा आहे. म्हातारपणामध्ये कुठलीही साधने नसतात. त्यामुळे दलित समाजाच्या म्हाताऱ्या आई-बाबांची चिंता जास्त वाढत असल्याची जाणीव वरील गीतांतून आविष्कृत झाली आहे.

प्रल्हाद बाबांनी लोकगीतांतून मातंग समाजाबरोबरच बहुजन समाजात एकतारीच्या भजन व गायनातून लोकगीताचे सादरीकरण खूप मोठ्या प्रमाणात केले आहे. समाजजागृतीचा व समाज मनोरंजनाचा ध्यास घेतलेले हे लोककलावंत परभणी जिल्ह्यातील लोकसंस्कृती टिकवून ठेवत आहेत ही सकारात्मक बाब आहे.

## ४.६ शाहिर देविदास आठवे :

पिंप्रुळा ता.सेलू जि. परभणी येथील शाहिर देविदास आठवे हे मातंग समाजाचे प्रबोधनकार म्हणून ओळखले जातात. स्वतः अशिक्षित असूनही समाजाच्या भल्यासाठी रात्रंदिवस राबणारा प्रबोधनकार व शाहिर म्हणून त्यांची ओळख आहे. १९८२ च्या अप्पासाहेब गोपले यांच्या चळवळीची प्रेरणा घेऊन अंध रुढी व गुलामगिरीची कामे सोडून शिक्षणाकडे मातंग समाजाने वळावे यासाठी त्यांनी आवाहन केले. पारंपरिक व परिवर्तनाची गाणी ते अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने गावोगावी गाऊ

लागले. डॉ.गोपले साहेब यांच्यावर श्रद्धा असणारा हा कार्यकर्ता त्यांच्या जीवनावर गीतरचना करून त्याला लोकांपर्यंत पोहचवतो. ते गीत असे -

"मातंगाचे नेते गोपले फिरले गावोगाव हो

डॉ.गोपले आहे त्यांचे नाव हो ।।धृ.।।

१९८१ ला मातंगाला नव्हते नाव

डॉ.गोपले फिरले तेव्हा गावोगाव।।१।।"[१०]

१९८० च्या दशकामध्ये मातंग समाजामध्ये डॉ.अप्पासाहेब गोपले यांनी 'आखील भारतीय मातंग महासंघ' नावाची संघटना स्थापन करून सबंध समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे ऐतिहासिक कार्य केले. मातंग समाजाच्या विविध मागण्यांसाठी दिल्लीपर्यंत जाऊन तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भेट घेतली. दादासाहेब गायकवाडानंतर त्यांनी दलित समाजात भूमिहीनांचा लढा डॉ.गोपले साहेब यांनी तेवत ठेवला. महाराष्ट्रातील गायरान जमिनी भूमिहीनांनी ताब्यात घ्याव्यात व सरकारने त्या दलितांच्या नावे करून द्याव्यात यासाठी जिल्हा कचेरी, आयुक्तालये, मंत्रालयावर अनेक मोर्चे काढले. गोपले यांच्या जीवनावरही अनेक गीते निर्माण झाली. त्यातून मातंग समाजामध्ये जागृतीचे कार्य करण्यासाठी बळ मिळाल्याचे शाहिर सांगत होते.

स्त्री-पुरुषांमध्ये भेदभाव असता कामा नये. स्त्रियांनासुद्धा सन्मानाची वागणूक मिळावी यासाठी लिहिलेली काही गीते त्यांनी सादर केली. दलित समाजात लवकर लग्न करून मुलींना शिक्षणापासून वंचित करण्यात येते. त्यासाठी त्यांच्यासमोर कर्तृत्ववान स्त्रियांचा आदर्श लोकगीतातून समोर ठेवला पाहिजे, असे त्यांना वाटत होते. ते म्हणतात,

"स्वागत करा स्त्री जन्माचे

आई-पित्यांनो तुम्ही

मुलीला समजू नका कमी

आठवा तुम्ही अहिल्या राणी

नार होती ती मर्दाणी

शूर होती ती लढली मैदानी"[११]

अशा पद्धतीने लोककलावंतांचा समाज जागृतीचे कार्य करण्याचा प्रयत्न पहायला मिळाला. लोकगीतांच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या जीवनातील वास्तव अनुभव मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. या लोककलावंतांनी जे लोकगीतांच्या माध्यमातून कार्य चालू ठेवले आहे हे निश्चितच सकारात्मक बाब आहे.

### ४.६ कवी आदिनाथ इंगोले :

मुळचे विदर्भातील असलेले आदिनाथ इंगोले शिक्षणाच्या निमित्ताने मराठवाड्यात आले आणि परभणी जिल्ह्यातील पूर्णा येथे प्राध्यापकाची नोकरी स्वीकारून स्थायिक झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या विचारांचे ते चाहते आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे व दलित संघटनांच्या अयशस्वीतेची ते आपल्या गीतातून चिकित्सा करतात. बाबासाहेबांनी दिलेल्या विचाराला आणि आंदोलनाला आपण टिकवलं पाहिजे, दलितांच्या उद्धारासाठी त्याचा शस्त्र म्हणून वापर केला पाहिजे, असा आशावाद असलेल्या गीतांचे सादरीकरण करताना ते म्हणतात -

"शिका, संघटित व्हा, लढा।।धृ.।।
हा दिला भीमानं धडा।।१।।
करू लढा भीमाचा खडा।।२।।
करू सर दिल्लीच्या गडा।।३।।
बहाद्दरांची फळी उभारून नव्या दमाची।।४।।"[१२]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांची चळवळ पुढे नेता येईल, असा आशावाद असलेली गीते निर्माण झाली. जसा महाराष्ट्रात दलित समाज विचारांच्या आणि आंदोलनांच्या पाठीमागे होता तसाच परभणी जिल्ह्यातीलही दलित समाज आंदोलनात सहभागी होऊन अग्रेसर राहिला आहे. नंतरच्या काळात नेते, कार्यकर्ते समाजाची नाळ तोडून आत्मकेंद्री बनले. लोकांना आपलं कोणी जवळंच आहे, असं ठिकाणच उरले नसल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची फार मोठी ताकद आणि बळ समजून लढा उभा करण्याचे व स्वत:चे आचरण सुधारण्याचे आवाहन करणारे गीत परभणी जिल्ह्यात ऐकायला मिळते.

"धन धनिकांनी पळवून नेलं मुला

आमचं जीणं गुलामीत गेलं मुला
सपन भीमाचं पुरं नाही झालं मुला
अजून गरीबाचं राज नाही आलं मुला
भीमक्रांती लढा, तू पुन्हा कर खडा."[१३]

वरील गीतामधून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरीत झालेली आई आपल्या मुलाला सावध करते आहे. आमचे जीवन गुलामी व लाचारीत गेले आहे. त्यामुळे बाबासाहेबांच्या विचाराचे धन घेऊन स्वाभिमानी भीमक्रांतीचा लढा पुन्हा उभा करण्याचे आवाहन करते आहे.

परभणी जिल्ह्यात दलित लोकगीतांच्या संशोधन संकलनासाठी गावोगावी गेल्यानंतर अनेक कार्यकर्ते, कलावंत स्त्रियांनी लोकगीते सादर करून दाखवली आहेत. काही लोकगीतांचे या प्रकरणात वाङ्मयीन मूल्यमापन करत असतांना निवड केली आहे.

परभणी जिल्ह्यातील भाषाशैली, बोलीभाषेचा प्रभाव काही लोकगीतावर जाणवतो तर काही लोकगीते संपूर्ण महाराष्ट्रात गायिली जाणारी आहेत. ती परभणी जिल्ह्यातही गायिली जातात. परभणी येथील शांताबाई भराडे यांनी एक ओवी सादर केली ती अशी-

"दिल्लीच्या तक्तावरील जोंधळ्याच्या झाल्या लाह्या
जन्मा आले भीमराव भारताची घटना लिहाया"[१४]

अशा कितीतरी ओव्या आजही दलित स्त्रिया आपल्या ओघवत्या शैलीमध्ये सादर करतात.

परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीते काही प्रमाणात पारंपरिक असून काही दलित लोकगीते ही वर्तमान जीवनात निर्माण झालेली आहेत. या सर्व गीतांना लोकांनी स्वीकारून आपले केले आहे. काही परिवर्तनाची, मनोरंजनाची तर काही श्रमपरिहारासाठीची गीते आजही सादर होतात.

या प्रकरणात दलित लोकगीतांचे संकलन करून आकलन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच वाङ्मयीन विश्लेषणापेक्षा आशय आणि अर्थ शोधण्याचा प्रयत्न

अधिक करण्यात आला आहे. भाषाशैली सरळ थेट, अर्थबोध करणारी असल्याचे सदर लोकगीतांमध्ये आढळून येते. म्हणून दलित लोकगीते भाषिक अंगाने अत्यंत महत्त्वाची वाटतात.

**संदर्भ**


१) शाहीर बुरखंडे यांनी संशोधनाने घेतलेल्या मुलाखतीत सादर केलेल्या गीतापैकी एक

२) कित्ता

३) कित्ता

४) संशोधकाने घेतलेल्या कांताबाई मनेरे यांच्या मुलाखतीत सादर केलेले लोकगीत.

५) कित्ता

६) संशोधकाने प्रत्यक्ष घेतलेल्या मुलाखतीमध्ये सादर केलेले लोकगीत

७) संशोधकाने प्रत्यक्ष मुलाखतीदरम्यान आशाताई गायकवाड यांच्याकडून ऐकलेले गीत

८) संशोधकाने प्रत्यक्ष घेतलेल्या मुलाखतीत प्रल्हाद बाबांनी सादर केलेले गीत

९) कित्ता

१०) संशोधकाने शाहिर आठवे यांची प्रत्यक्ष मुलाखत घेतल्यानंतर त्यांनी सादर केलेले गीत

११) कित्ता

१२) इंगोले आदिनाथ, शिकवण भीमाची, (भीम क्रांतीगीते), जनशक्ती प्रकाशन, जनशक्ती, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई, पहिली आवृत्ती ६ डिसेंबर २०१०, पृ.क्र.१

१३) कित्ता, पृ.०४

१४) संशोधकासमोर प्रत्यक्ष मुलाखतीत सादर केलेले गीत

## प्रकरण पाचवे

# निष्कर्ष व समारोप

परभणी जिल्हा हा संत-महंतांचा जसा आहे तसाच कलावंतांचाही आहे. 'परभणी जिल्ह्यातील दलितांची लोकगीते : एक विवेचक अभ्यास' या लघुशोध प्रबंधाच्या निमित्ताने संशोधन आणि अभ्यास करताना हाती आलेले एकंदरीत चार प्रकरणातील निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात मांडायचे असून शेवटी समारोपात्मक विवेचन केले जाणार आहे.

प्रस्तुत लघुशोध प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणाचे शीर्षक 'परभणी जिल्ह्याचे वेगळेपण' असे जाणीवपूर्वक घेतले असून, या प्रकरणात एकूणच आशिया खंडातील भारतासारख्या भौगोलिक विविधतेने नटलेल्या संघराज्यातील महाराष्ट्र प्रदेशाच्या राजकारणात आणि समाजकारणात, अर्थकारणात महत्त्वाची भूमिका बजावणारा मराठवाड्याचा केंद्रबिंदू असलेला परभणी जिल्हा हा सर्वार्थाने अभ्यासला आहे. या जिल्ह्याचा पूर्वइतिहास निजामी आणि इंग्रजी या दोन्ही राजवटीच्या गुलामगिरीचा असला तरी स्वातंत्र्यानंतर अल्पावधीतच लेखक-कलावंतांनी प्रबोधनाच्या लढ्याला आपल्या कलेतून ऊर्जा दिली. त्यातून उभा राहिलेल्या संघर्षामुळे या जिल्ह्याला लवकरच आत्मभान आले आणि हा जिल्हा विकासाच्या मार्गावर सन्मानाने मार्गस्थ झाला. प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्याचा ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक आढावा अभ्यासकाच्या भूमिकेतून घेतला आहे. या प्रकरणात संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष सार रूपात ठेवत आहे ते असे.

**निष्कर्ष :**

१) महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात या जिल्ह्याने अमिट ठसा उठविलेला आहे.

२) महाराष्ट्राला ज्वारीची रसद पुरविणारा, अर्ध्या अधिक महाराष्ट्राची भूक भागविणारा हा जिल्हा आहे.

३) हमखास पाऊस पडणारा निसर्ग सौंदर्याने नटलेला जिल्हा आहे.

४) या जिल्ह्यात जातदांडगे आणि धनदांडग्यांकडून गोरगरिबांचे मोठ्या प्रमाणात शोषण झालेले दिसून येते.

५) दलित समाजावरील अन्याय-अत्याचार कमी झालेले नाहीत.

६) परभणी जिल्हा सर्वात जुना असूनही स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात राजकीय वर्चस्व निर्माण करू शकला नाही.

७) विषमतावादी विचाराने बुरसटलेल्या मानसिकतेमुळे जातीय दंगली, धार्मिक दंगलीमुळे बदनाम होण्याची वेळ या जिल्ह्यावर नेहमीच आलेली आहे.

८) समृद्ध साहित्यिकांची परंपरा लाभलेला एक महत्त्वपूर्ण जिल्हा आहे.

९) परभणी जिल्ह्यातील प्रमुख व्यवसाय शेती आहे.

१०) दुष्काळी परिस्थितीमुळे मुंबई, पुणे, नाशिककडे स्थलांतरीतांचे तसेच ऊसतोड मजुरांचे प्रमाण जास्त आहे.

११) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे असल्यामुळे प्रगत शेतीसाठी विद्यापीठाचे मार्गदर्शन लाभते.

१२) परभणी जिल्ह्याच्या समाजजीवनावर सरंजामशाहीचा मोठा परिणाम आहे.

१३) जातीच्या नावावर दलितांच्या मानवी हक्काचे संरक्षण होताना दिसून येत नाही.

१४) लोककलावंत भांडवलशाहीमुळे देशोधडीला लागले. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील लोकपरंपरा व लोकसंस्कृती लोप पावण्याच्या मार्गावर आहे.

१५) 'आरे रे' व 'नाही रे' वर्गाचे लोक मोठ्या प्रमाणात असल्याने संघर्षाची भूमी म्हणून परभणी जिल्हा ओळखला जातो.

**प्रकरण दुसरे**

प्रस्तुत लघुशोध निबंध प्रकल्पाचे दुसरे प्रकरण 'परभणी जिल्ह्यातील दलित जीवन' हे आहे. या प्रकरणातत एकूणच देशपातळीवरील दलितांच्या सामाजिक, राजकीय वर्तमान स्थितीच्या संदर्भात परभणी जिल्ह्यातील दलित जीवनाचा सर्वांगीण आढावा घेण्यात आला आहे. सदरील प्रकरणात खालील निष्कर्ष हाती आले आहेत.

**निष्कर्ष :**

१) परभणी जिल्ह्यात अतिशूद्र गणल्या गेलेल्या दलितांचे जीवन अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य यात कमालीचे गुरफटून गेलेले आहे.

२) परभणी जिल्ह्यातील दलितांची स्थिती सवर्णांच्या प्रचंड दडपणामुळे अत्यंत केविलवाणी झालेली दिसून येते.

३) गावाच्या वेशीबाहेर दलितांच्या वस्त्या आजही बेवारस स्थितीत आढळून येतात.

४) बौद्ध धम्माच्या स्वीकारामुळे पूर्वाश्रमीच्या महार व आताच्या नवबौद्ध समाजाच्या जीवनात नवे सांस्कृतिक मन्वंतर घडले. धार्मिक प्रतिमा व प्रतिके बदलली. मात्र मातंग, चांभार, ढोर या दलितांचे सांस्कृतिक जीवन गुलामी व लाचारीचे राहिले.

५) अस्पृश्यता हा कायद्याने गुन्हा असला तरी हिंदू धर्माच्या परंपरेनुसार आजही परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अस्पृश्यता पाळली जाते.

६) १९५६ च्या धर्मांतरानंतर महार समाजाने सोडून दिलेली सर्व गुलामीची कामे गाव व्यवस्थेकडून मातंग समाजाच्या डोक्यावर लादण्यात आली.

७) शिक्षणामुळे मातंग या जातसमूहात बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार होत आहे.

८) ढोर व चांभार जातसमूहात संत रविदास जयंतीच्या माध्यमातून परिवर्तनाच्या विचाराचा प्रचार होत आहे.

९) दलिज समाज भूमीहीन असल्यामुळे सवर्णांच्या शेतावर त्याला कामासाठी जावेच लागते म्हणून तो अन्यायाचा बळी ठरतो.

१०) दलित समाजातील अनेक शाहिर गीतांच्या माध्यमातून सामाजिक सलोखा निर्माण करणारी अनेक परिवर्तनाचे गीते गातांना दिसतात.

११) शिक्षणाचे महत्त्व न जाणल्यामुळे वेगवेगळ्या प्रकारचे अन्याय-अत्याचार दलितांवर होतांना दिसून येतात.

१२) परभणी जिल्ह्यात काळी कसदार शेती असली तरी येथील दलित बहुतांश भूमीहीन असल्यामुळे तो आर्थिक परिस्थितीने दुबळा आहे.

१३) राजकीय सत्ता नसल्यामुळे दलितांना शासकीय योजनांचा फायदा योग्य प्रमाणात मिळत नाही.

१४) हिंदू म्हणून जगणारा दलित समाज हिंदू संस्कृतीचे सण-उत्सव साजरे करतो व जयंती उत्सवालाही हजेरी लावतो.

१५) सामाजिक सौहार्द राखण्यासाठी परभणी जिल्ह्यात प्रयत्न व्हावेत यासाठी काही लोक प्रयत्न करतांना दिसताहेत, ही जमेची बाजू आहे.

**प्रकरण तिसरे**

प्रस्तुत लघुशोध प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणाचे शीर्षक 'परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीतांचे वर्गीकरण' असे असून या प्रकरणात दलित लोकगीतांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. या प्रकरणात लोकगीत म्हणजे काय? शेतीशी निगडित श्रमविषयक लोकगीते, विधीगीते, लोकरंजनपर लोकगीते, आंबेडकरी लोकगीते आदी वर्गीकरणाच्या माध्यमातून परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीतांचा आढावा घेण्यात आला आहे. साररूपाने आढावा घेण्यात आलेल्या लोकगीतांच्या माध्यमातून हाती आलेले निष्कर्ष यापुढे ठेवण्यात येत आहेत.

**निष्कर्ष :**

१) महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारा परभणी जिल्हा हा लोककलावंतांचा बालेकिल्ला समजला जातो.

२) परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीतांचे दोन वर्ग स्पष्टपणे दिसून येतात. एक पारंपरिक व एक परिवर्तनवादी.

३) लोकगीते म्हणजे लोकसाहित्याचा आत्माच समजला जातो.

४) निरक्षर सामान्य माणसांनी लोकवाणीने जसे लोकसाहित्य जीवंत ठेवले तसेच लोकगीतेही लोकवाणीने आणि लोकपरंपरेने जीवंत ठेवले आहेत.

५) लोकगीत हे मानवी जीवनाचे एक सांस्कृतिक अंग आहे.

६) श्रमपरिहारातून थकवा घालविण्यासाठी गायल्या गेलेल्या लोकगीतांना श्रमविषयक लोकगीते म्हणता येईल.

७) भलरी गीतांतून थट्टामस्करी, प्रीतीचा भाव, प्रेमजाणिवा, रंगेलपणा, उपहास यांचे संमिश्रण पहायला मिळते.

८) भय आणि अज्ञान या दोन्ही प्रवृत्तींमधून माणूस स्वत:ला सुरक्षित ठेवण्यासाठी ही विधीगीते विविध देवता आणि उपासना दैवत यांना समोर ठेवून विधीगीतांचा वापर होतो.

९) दलित समाज हा मुळातच सर्वहारा असला तरी त्यांचे सांस्कृतिक जीवन मात्र समृद्धतेने नटलेले दिसून येते.

१०) सामाजिक प्रबोधनपर म्हणून गायल्या जाणाऱ्या साठे-आंबेडकरी जलशातही प्रबोधनाबरोबरच हलकी-फुलकी विनोदी गाणी गावून लोकरंजन साधले जाते.

११) दलित समाजाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन लोकगीते निर्माण करण्याचा आणि समाजात रुजवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

१२) शाहिर कलावंतांनी क्रांतीची मशाल हातात घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जग बदलण्याचे तत्त्वज्ञान लोकगीतांतून गायले.

**प्रकरण चौथे**

प्रस्तुत लघुशोध प्रकल्पांतर्गत 'परभणी जिल्ह्यातील दलितांची लोकगीते : संकलन आणि आकलन' हे चौथे प्रकरण असून या प्रकरणात परभणी जिल्ह्यातील लोककलावंत व शाहिरांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन लोकगीतांचे संकलन करू आकलन केले आहे. संकलित करण्यात आलेले दलित लोकगीतांचे आकलन करून विवेचन केले आहे. या प्रकरणात हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडण्यात आले आहेत.

**निष्कर्ष :**

१) परभणी जिल्ह्यात दलित समाजाबरोबरच अल्पभूधारक शेतकरी, बारा बलुतेदार, अठरा अलुतेदार, भटका माणूस आजही स्वातंत्र्यानंतर अनेक समस्यांना तोंड देताना दिसून येतो.

२) समाजसुधारकांचे गुणवर्णन करणारे लोकगीत महाराष्ट्रात जसे गायिले जातात तसे परभणी जिल्ह्यातही गायिले जातात.

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्यावर भारतभर जशी लोकगीते तयार झाली, तशीच परभणी जिल्ह्यातही लोकगीतांची निर्मिती लोककलावंतांनी केली आहे.

४) वर्तमानकाळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने शिक्षण घेतल्यामुळे आज झोपडीतील माणूस कलेक्टर होतो आहे.

५) दलित लोकगीतांतून महापुरुषांच्या कार्यकर्तृत्वाबरोबर विचारांचाही आदर्श समाजासमोर ठेवण्याचा कलावंत प्रयत्न करताना दिसून येतात.

६) लोकगीते मनोरंजनाबरोबर विचारही देतात.

७) जन्म-मृत्यूच्या लोकगीतांमधून माणूस सावध होतो.

८) समाजजागृतीचा व समाज मनोरंजनाचा ध्यास घेतलेले हे लोकलावंत परभणी जिल्ह्यातील लोकसंस्कृती टिकवून ठेवत आहेत, ही सकारात्मक बाब आहे.

९) दलित समाजात लवकर लग्न करून मुलींना शिक्षणापासून वंचित करण्यात येते.

१०) परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीते काही प्रमाणात पारंपरिक असून काही दलित लोकगीते ही वर्तमान जीवनात निर्माण झालेली आहेत.

११) दलित लोकगीते भाषिक अंगाने अत्यंत महत्त्वाची वाटतात.

१२) अनेक मर्यादा ठेवून या लोककलावंतांनी जे लोकगीतांच्या माध्यमातून कार्य चालू ठेवले आहे, हे निश्चितच सकारात्मक आहे.

परभणी जिल्ह्यातील दलित समाजाच्या सांस्कृतिक जीवनात लोकगीते मोलाचे योगदान देतात. सांस्कृतिक जीवन समृद्ध करणारे लोककलावंत मात्र उपेक्षेचे जीवन जगताना आढळतात. त्यांच्या कलेची कदर करून त्यांना मानधन देऊन अथवा उपजीविकेची हमी घेऊन सरकारने मदत केली तर निश्चितच त्यांना स्थैर्य लाभेल, असे सुचवावेसे वाटते. सामाजिक परिवर्तनासाठी आपले आयुष्य समर्पित करणारे हे लोककलावंत जगण्याशी संघर्ष करतच सामाजिक संघर्षाचे चिंतन करतात. त्यामुळे या लोककलावंतांचे आणि लोकगीतांचे संवर्धन करणेही महत्त्वाचे वाटते.

❑❑❑

# संदर्भ ग्रंथसूची

१) बालवाड रमेश, आपला परभणी जिल्हा, विद्याभारती प्रकाशन, गुजराती शाळेसमोर, मेन रोड, लातूर -४१३ ५१२.

२) पाटील श्रीराम (संपा.), मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, १४, मायानगर, एन-२, सिडको, औरंगाबाद-४३१००३, द्वितीय आवृत्ती, सप्टेंबर २००३.

३) लुलेकर प्रल्हाद, जातक (प्रा.दत्ता भगत गौरवग्रंथ), लेख उद्धृत सामाजिक न्याय : संकल्प आणि सिद्धी, वाघमारे जे.एम., कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती

४) साठे अण्णा भाऊ, निवडक वाङ्मय, संपादक अर्जुन डांगळे व इतर, सचिव म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९८

५) किरवले डॉ.कृष्णा, समग्र लेखक बाबुराव बागूल, प्रतिमा प्रकाशन, १३६२, सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंटस, नवा विष्णू मंदिर चौक, पुणे, प्रथमावृत्ती नोव्हेंबर २००२

६) व्हटकर डॉ.जयवंत, दलित साहित्याची संकल्पना, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. २५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११०३५ प्रथमावृत्ती १५ जानेवारी २००६

७) पानतावणे डॉ.गंगाधर, संपादन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, जातीव्यवस्थेचे निर्मूलन, प्रतिमा प्रकाशन, १३६२, सदाशिव पेठ, नवा विष्णू चौकाजवळ, पुणे, प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९८

८) पवार दया (निमंत्रक) संपादन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गौरवग्रंथ, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, दादर, मुंबई, तृतीयावृत्ती नोव्हेंबर २००६, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन, बा.ह. कल्याणकर,

९) फडके डॉ.भालचंद्र दिनकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शे.का. फेडरेशन.

१०) व्यवहारे शरद, लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास, विश्वभारती प्रकाशन, धनवटे चेम्बर्स सीताबर्डी, नागपूर - ४४० ०१२

११) व्यवहारे शरद, लोकसाहित्य (संकल्पना स्वरूप), तिरूपती प्रकाशन, लोकमान्यनगर, परभणी, द्वितीय आवृत्ती १६ डिसेंबर २००४

१२) भिसे गणपत, धुपात्री, जनशक्ती वाचक चळवळ, पिनाक, २४४, समर्थनगर, औरंगाबाद ४३१००१ प्रथमावृत्ती ५ जानेवारी २०१२

१३) व्यवहारे शरद, लोकवाङ्मय : रूप-स्वरूप, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती सप्टेंबर १९९१

१४) मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, परिमल प्रकाशन, परिमल प्रकाशन, खडकेश्वर, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९९८.

१५) लुलेकर डॉ.प्रल्हाद, आंबेडकरी जलसे, डॉ.भगवान ठाकूर, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जुलै २०१०५.

१६) कर्डक वामन, मोहळ, शब्ददान प्रकाशन, सविता नगर, तरोडा, नांदेड, द्वितीयावृत्ती १४ एप्रिल २०१४

१७) डांगळे अर्जुन, संपादक, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९८

१८) खडसे खुशाल, जागतिक कीर्तीचे लोकशाहीर विठ्ठल उमप, नेहा प्रकाशन, १२०, गुरूनानकपुरा, बेझनबाग, नागपूर, प्रथमावृत्ती १४ एप्रिल २०१२.

१९) इंगोले आदिनाथ, शिकवण भीमाची, (भीम क्रांतीगीते), जनशक्ती प्रकाशन, जनशक्ती, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई, पहिली आवृत्ती ६ डिसेंबर २०१०.

२०) https:/him/Wikipedia.org.

२१) दुरडी ता.जि.परभणी येथे शाहिर गंगाधर पवळे यांची संशोधकाने घेतलेली मुलाखत

२२) प्रस्तुत संशोधकाने मौजे रामपुरी (बु.) ता.मानवत जि.परभणी येथे रायरंदाकडून ऐकलेले गीत

२३) पाथरी जि.परभणी येथे शाहीर बुरखंडे यांची संशोधकाने घेतलेली मुलाखत

२४) पाथरी जि.परभणी येथे कांताबाई मनेरे यांची संशोधकाने घेतलेली मुलाखत

२५) सोनपेठ जि.परभणी येथे आशाताई गायकवाड यांची संशोधकाने घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत

२६) सेलू जि.परभणी येथे लोककलावंत प्रल्हाद घोडे यांची संशोधकाने घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत

२७) सेलू जि.परभणी येथे शाहिर आठवे यांची संशोधकाने घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत

२८) किन्होळा ता.मानवत येथे लोककलावंत (पोतराज) रामकिशन वाकोडे यांची संशोधकाने घेतलेली मुलाखत

२९) पुर्णा जि.परभणी येथे प्रा.डॉ.आदिनाथ इंगोले यांची संशोधकाने घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत

३०) परभणी येथे सारजाबाई भराडे यांची संशोधकाने घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत

❒❒❒

# परिशिष्ट

# छायाचित्रे



पाथरी जि.परभणी येथील लोककलावंत कचरुजी बुरखुंडे यांची मुलाखत घेताना

संशोधक



सोनपेठ जि.परभणी येथील लोकगायिका आशाताई गायकवाड यांची मुलाखत घेताना

संशोधक



सेलू जि.परभणी येथील लोककलावंत प्रल्हादबाबा घोडे यांची मुलाखत घेताना संशोधक



पाथरी जि.परभणी येथील लोककलावंत कांताबाई मनेरे यांची मुलाखत घेताना संशोधक